म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ४७२
१०१६

॥ श्रीबाळकृष्णमहाराज प्रसन्न ॥

# पंडित
# जगन्नाथराय.

भगवंत गोविंद तोडेवाळे.

REFBK-0001332
REFBK-0001332

SHRI BHARAT BOOK-DEPOT
BUDHWAR PETH POONA.

9332



महाराष्ट्र खंडेवाल श्रावगी,
श्री० कचरदास चुनिलालशेट,
साष्टे–पिंपळगांव.

श्रीसाधु बाळकृष्णमहाराज प्रसन्न.

# पंडित जगन्नाथराय.

REFBK-0001332
REFBK-0001332

हें काव्य

ज्योतिर्विभूषण, ज्योतिःकलादर्श व काव्यभूषण

**भगवंत गोविंद तोडेवाले**

सरसुभेदार-

श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य-शृंगेरी,

उत्पादक व चालक गृहविहारभुवन-पैठण, व

श्रीसाधु बालकृष्णमहाराज यांचें चरित्र, चेहऱ्यावरून कुंडली मांडणें, नोकरीचा राजीनामा, शुकरंभासंवाद (उर्दू) सद्रत्न-पद्यमाला, व अज्ञानकंसवध या पुस्तकांचे कर्ते

यांनीं तयार केलें.

शके १८३८, सन १९१६.

किंमत ४ आणे.

मुद्रक-अच्युत चिंतामण भट, यशवंत प्रेस, पुणें.
प्रकाशक-भगवंत गोविंद तोंडेवाले, पैठण.

# प्रस्तावना.

जगन्नाथपंडित यांचा जन्म तैलंगीय[1] वेगिनाडि[2] नांवाच्या ब्राह्मणकुलांत झाला. यांच्या[3] बापाचें व आईचें नांव अनुक्रमें पेरुभट्ट व लक्ष्मी असें होतें. पेरुभट्टानें[4] काशीच्या ज्ञानेंद्रयतीपासून वेदांतशास्त्र, महेंद्रपंडितापासून न्यायशास्त्र, खंडदेवापासून पूर्वमीमांसा, व वीरेश्वर शेष यांजपासून महाभाष्य यांचें अध्ययन केलें. जगन्नाथपंडितांनींहि बहुतेक सर्व शास्त्रांचा अभ्यास आपल्या बापाजवळच करून लवकरच त्यांत ते प्रवीण झाले. पुढें वयांत येतांच आपलें घर सोडून पंडित दिल्लीपति शहाजहानाकडे गेले व तेथें त्यांनीं त्याचा आश्रय आपल्या

---

१. '**तैलंगान्वयमंगलालय**–' व '**...तैलंगकुलावतंसेन पंडितजगन्नाथेन...**' इत्यादि अनुक्रमें प्राणाभरणाच्या शेवटीं व आसफविलासाच्या आरंभीं मजकूर आलेला आहे.

२. भामिनीविलासाच्या कांहीं प्रतींत शेवटीं '**श्रीमदखिलांध्रवेगिनाडिकुलावतंस**--' असा पाठ आढळतो.

३. **पाषाणादपि पीयूषं स्यंदते यस्य लीलया ॥**
**तं वंदे पेरुभट्टाख्यं लक्ष्मीकांतं महागुरुम् ॥ १ ॥** रसगंगाधर.

४. **श्रीमज्ज्ञानेन्द्रभिक्षोरधिगतसकलब्रह्मविद्याप्रपंचः ।**
**काणादीरक्षपादीरपि गहनगिरो यो महेन्द्रादवेदीत् ॥**
**देवादेवाध्यगीष्टस्मरहरनगरे शासनं जैमिनीयम् ।**
**शेषाङ्कप्राप्तशेषामलभणितिरभूत्सर्वविद्याधरो यः ॥ १ ॥**

—रसगंगाधर.

५. **भूमीनाथ शहाबुद्दीन भवतस्तुल्यो गुणानां गणै–**
**रेतद्भूतभवप्रपञ्चविषये नास्तीति किं ब्रूमहे ।**
**धाता नूतनकारणैर्यदि पुनः सृष्टिं नवां भावये--**
**न्न स्यादेव तथापि तावकतुलालेशं दधानो नरः ॥ १ ॥**

—रसगंगाधर.

विद्वत्तेच्या जोरावर संपादन केला. बादशहानें त्यांस बहुमानानें 'पंडितराज' ही पदवी दिली. त्यांनीं आपल्या वयाचा बराच भाग शहाजहान बादशहा व त्याचा पुत्र दाराशिकोह् यांच्या सहवासांत घालविल्यानंतर वार्धक्य प्राप्त झाल्यावर उरलेलें आयुष्य मथुरेस येऊन घालविलें. कोणी ते काशीस येऊन राहिले असेंहि म्हणतात.

याप्रमाणें पंडितांची उपलब्ध असलेल्या ग्रंथांतून मिळालेली माहिती कै० पंडित दुर्गाप्रसाद यांनीं काव्यमालेंत प्रसिद्ध झालेल्या 'रसगंगाधर' ग्रंथाच्या प्रस्तावनेंत दिलेली आहे. याशिवाय जगन्नाथपंडितांसंबंधीं बऱ्याच दंतकथा चालत आलेल्या आहेत. त्यांपैकीं-( १ ) जगन्नाथपंडितांचें अध्ययन संपल्यानंतर जयपुरास जाणें, तेथें दिल्लीदरबारच्या एका संस्कृतज्ञ विद्वान् काजीशीं धर्माबद्दल वाद, त्यांत पंडितांचा जय, नंतर दिल्लीपति अकबर बादशहाचा आश्रय, तेथें लवंगीनामक एका यवनीचें पाणिग्रहण ( कोणी हिला बादशहाची

---

६. ......नवाबासफखानमनःप्रसादेन द्विजकुलसेवाहेवाकिवाङ्मनःकायेन माथुरकुलसमुद्रेंदुना रायमुकुन्देनादिष्टेन सार्वभौमश्रीशाहजहांप्रसादादधिगतपण्डितराजपदवीविराजितेन तैलंगकुलावतंसेन पण्डितजगन्नाथेनासफविलासाख्येयमाख्यायिका निरमीयत......'

—आसफविलास.

७. जगदाभरण काव्यांत दाराशिकोह याची स्तुति केलेली आहे.

८. भामिनीविलासाच्या शेवटीं वेगवेगळ्या प्रतींत खालील दोन पाठ सांपडतात.

१ संप्रत्युज्झितवासनं मधुपुरीमध्ये हरिः सेव्यते ।
२ सम्प्रत्यन्धकशासनस्य नगरे तत्वं परं चिन्त्यते ॥

९. न याचे गजालिं न वा वाजिराजिं
न वित्तेषु चित्तं मदीयं कदापि ।
इयं सुस्तनी मस्तकन्यस्तहस्ता
लवंगी कुरंगीदृगंगीकरोतु ॥ १ ॥ इत्यादि श्लोक.

कन्या असें म्हणतात. ), पुढें मनास पश्चात्ताप होऊन पंडितांचें काशीस गमन, तेथें बहिष्कार, अप्पयादीक्षितांची भेट, गंगालहरीस्तुति व शेवटीं यवनीसह गंगेंत मुक्ति. ( २ ) पंडितांचें जन्मठिकाण तैलंगणांत 'मुगंडा' हें गांव होय. ( ३ ) जगन्नाथानें तीव्र तपश्चरण करून देवीस प्रसन्न करून घेतलें व तिनें त्यास वरं दिला–इत्यादि विशेष प्रचलित आहेत. परंतु त्यांस समाधानकारक पुरावा सांपडत नाहीं.

धनंजय छापखान्याच्या मालकांनीं प्रसिद्ध केलेल्या 'पंडित जगन्नाथराय' या पुस्तकाचा आधार घेऊन माझे स्नेही ज्योतिर्विभूषण भगवंतराव गोविंद तोडेवाले--पैठणकर, यांनीं पुढील काव्य रचलें आहे. वर उल्लेखिलेल्या पुस्तकांत ऐतिहासिक प्रमाणांचा आव दाखवून वर लिहिलेल्या पहिल्या आख्यायिकेचाच विस्तार केलेला आहे. म्हणून पुढील काव्य ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीनें न पहातां केवळ काव्यदृष्टीनेंच वाचकांनीं पहावें.

एकंदरींत कविता सुगम आहे. काजीचा व पंडितांचा वाद तर विशेष बारकाईनें पहाण्याजोगा आहे. अल्ला आणि ॐकार यांचें अर्थसाम्य युक्तिवादानें दाखवून फारसी लिपींतील अल्लाह् व संस्कृत ॐ या अक्षरांचें अवयवशः साम्य दाखविलेलें आहे. कवीनें उर्दू भाषेचा चांगला अभ्यास केलेला आहे हें त्या भाषेंतील कवितेवरून लक्षांत येईलच.

महाराष्ट्रकाव्यलोलुप गृहस्थ कवीच्या या कृतीचें ग्रहण हंसक्षीरन्यायानें करतील अशी आशा आहे.

ग. ना. मुजुमदार.

---

१०. आकुरुदेशं विचरेर्मा कुरु परवादिनिर्जये शङ्काम् ॥
स्वीकुरु वरमेकं मे व्याकुरु भो वत्स शास्त्राणि ॥ १ ॥

# कर्त्याचे दोन शब्द.

प्रस्तुत अल्प कृतीचा श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं ऐतिहासिक दृष्ट्या आपल्या विद्वत्तेस साजेलशा भाषेंत ऐतिहासिक दृष्टीनें परामर्ष घेतला आहे. त्यावरून या काव्यास ऐतिहासिक पाठबळ किती व कशा प्रकारचें आहे हें वाचकांस कळून येईल.

या प्रस्तावनेचा लाभ करून दिल्याबद्दल श्रीमंतांचा लेखक फार अभारी आहे. यांनीं केवळ लोभाखातर लेखकासाठीं जे परिश्रम घेतले त्यांबद्दल श्रीमंतांचें अंशतः देखील उतराई होणें दुरापास्त आहे. यासंबंधीं प्रस्तुत लेखकास असें वाटतें कीं, काव्यविषयास इतिहासाची कसोटी लावण्याचें वस्तुतः फारसें प्रयोजन दिसत नाहीं. कारण, काव्याचें प्रधान अंग जें मनोरंजन किंवा रसोत्पत्ति, तें चांगलें साधलें म्हणजे कवीनें आपली कामगिरी बजावली असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. सुंदर कोमलांगी पीठ पुष्कळ दळील कीं नाहीं हें कोणी रसिक पाहणार नाहीं. त्याचप्रमाणें काव्य आपल्या ज्ञानांत भर घालील किंवा नाहीं हें काव्याचा खरा भोक्ता पाहत न बसतां त्याचे हृदयाचें खरें समाधान झालें म्हणजे तो तृप्त होईल. श्रीमंत आबासाहेब मुजुमदार यांनीं प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें ऐतिहासिक दृष्टीनें पंडित जगन्नाथराय यांचा विचार होणें हेंहि अगत्याचें आहे हें खरें; परंतु त्याच्या उपपत्तीच्या अभावीं काव्याच्या सौरसाची कांहीं हानि होत नाहीं असें या लेखकास वाटतें.

प्रस्तुत काव्य 'काव्य' या महनीय अभिधानास कितपत पात्र आहे हें ठरविण्याचें काम कर्त्याचें नसल्यामुळें याविषयीं येथें ऊहापोह करण्याचें कारण नाहीं. रसिक वाचक योग्य तो अभिप्राय देतीलच.

कथेच्या अनुरोधानें विविधवृत्तयोजना केली आहे. ती रसपोषक होऊन वाचकांस मनोरंजक होईल असा भरंवसा आहे. मधून मधून उर्दूमध्येंही कांहीं रचना केली आहे. उर्दू भाषा न जाणणारांच्या सोईसाठीं टीपेंत जेथल्या तेथें मराठींत अनुवाद केला आहे. या योगानें काव्यास विशेष मनोवेधकता येऊन

जगन्नाथाच्या काळची अल्पमात्र तरी अठवण होईल अशी मला अशा आहे.

'जेथें जातों तेथें, तूं माझा सांगाती' या तुकोबांच्या वचनाचा किंचिन्मात्र अनुभव आला आहे अशा मनःस्थितींत प्रस्तुत काव्य लिहिलें गेल्यामुळें यावनीय धर्मांत सुद्धां मंत्रराज प्रणवाचेंच अधिराज्य आहे असें मनास आढळून आलें, व तेंच वाणीनें यथाशक्ति वर्णिलें आहे. जगांतील यच्चयावत् धर्मांचें मूळ एकच आहे, व तसें असणें अगदीं स्वाभाविक आहे असें प्रस्तुत लेखकास वाटतें. अल्लाह व ॐ यांचें साम्य पुस्तकांत दाखविलें आहे. तें वाचकांस कितपत पटेल हें सांगवत नाहीं. परंतु लेखकास तें आढळून आल्यापासून सात्विक आनंदाचा लाभ झाला इतकें मात्र खरें.

हा विषय शब्दद्वारें समजण्यास जड जाईल असें वाटून लेखकानें विषय सुगम होण्यासाठीं मधून मधून आलीं तशीं वेडींवांकडीं कांहीं चित्रें स्वतः काढून घातलीं आहेत. तीं विद्वज्जनांस आवडल्यास व त्यांचा काव्य उलगडण्यास थोडाबहुत उपयोग झाल्यास कर्त्यास आपल्या श्रमाचें चीज झालें असें वाटेल. प्रस्तुत काव्य प्रकाशित करण्यास वाणीनें आणि द्रव्यद्वारें मदत करणारे श्रीमहाराष्ट्र खंडेलवाल श्रीमंत शेट कचरदास चुनीलाल साहू दिगंबर जैन श्रावक–राहणार मुक्काम साष्टीपिंपळगांव, तालुके पैठण, जिल्हा औरंगाबाद, यांचा प्रस्तुत लेखक फार फार आभारी आहे. या थोर गृहस्थांना काव्य वाचनाचा फार नाद आहे व हे मोठे रसिक आहेत. अल्पवयांत अशा प्रकारची उदारता क्वचितच दृष्टीस पडते.

आस्थेनें समग्र काव्य पाहून कांहीं सूचना करणाऱ्या रा. माधव गोविंद भिडे या नूतनपरिचित कविमित्रांचा येथें सप्रेम उल्लेख करितों. यांनीं (उपसंहारात्मक) चार कविता तात्काल रचून दिल्या याबद्दल हा लेखक त्यांचा फार ऋणी आहे. त्याचप्रमाणें पैठणचे मुन्सफ श्री. बक्षी सुदर्शनप्रसाद यांचाही तो फार आभारी आहे. यांस पंडित जगन्नाथांच्या काव्यांची फार गोडी असून त्यासंबंधाच्या ऐतिहासिक शोधांचीही त्यांस चांगली आस्था आहे. त्यामुळें त्यांकडून मला या कामीं चांगलेंच उत्तेजन मिळालें आहे.

पैठणचे विद्वान व गुरुभक्त श्रीयोगिराज प्रसिद्ध वासुदेवानंदसरस्वती यांचे प्रेमळ शिष्य रा. रा. नरहरराव नानासाहेब मोघे हेडमास्तर यांनीं साहित्यशास्त्राचा लेखकास परिचय करून दिला, त्याबद्दल त्यांचें लेखक कृतज्ञतापूर्वक सप्रेम स्मरण करितो. अच्युतराव भट यांनीं काळजीपूर्वक छपाईचें काम केलें आहे. लेखक त्यांचाहि आभारी आहे.

शेवटीं— **काय माझी वाणी मानेल संतांसी ।**
**आपुल्या चित्तासी रंजवावें ॥**

या तुकोबांच्या वचनाच्या चिंतनांत लेखणीस विश्रांति देतों.

**कर्ता.**

---

## एक हिंदी अभिप्राय.

हमने रसिकवर श्रीयुत भगवंत गोविंद तोडेवालेजी कृत पंडित जगन्नाथराय के काव्यबद्ध चरित्र का अवलोकन किया । वास्तव में, तोडेवालेजी का यह कार्य प्रशंसनीय हुआ है । आपने पंडित जगन्नाथराय का कविताबद्ध चरित्र लिखकर भाषा-प्रेमियों का शारदासदन मंडित करने की जो चेष्टा की है, वह, हमारे मत से, कुछ अंश में तो अवश्य ही सफल हुई है । चरित्र के ॐकारमय गणपति तथा शिवजी के चित्रावलोकन से आपकी चित्रकला वा कल्पनाशक्ति का तथा विविध छंदों और चित्रबंध, तुग़रा तथा चतुर्गुच्छमालाबन्धादि से आपके अधीत विषय का अच्छा पता चलता है । आपकी चरित्र चित्रण तथा विषयप्रतिपादन की शैली भी अच्छी है । चरित्र में, प्रतिपाद्य विषय के अनुसार, कुछ उर्दू छन्द रख देने से इसका महत्व भी बढ गया है । सारांश, श्रीयुत तोडेवालेजी की इस कृति को यथायोग्य दृष्टि से देखने का भार हम इसके पाठकों पर ही छोडते हैं ।

सरस्वतीमंदिर, पूना सिटी ।
श्रीहनुमज्जयंति, शके १८३८.

**भास्कर रामचंद्र भालेराव,** 'कविदास'
संपादक, 'हिन्दी चित्रमय जगत्.'

---

पंडित जगन्नाथराय.

## चित्रबंध चामर.

कविता ४



पंडित जगन्नाथराय. चतुर्गुच्छमाला-बंध.

श्लोक ५



(स्थळ प्रत)

श्रीबालकृष्णमहाराज प्रसन्न.

# पंडित जगन्नाथराय.

( शार्दूलविक्रीडित )

श्रीलंबोदर शुंड चंड मिरवी ॐकाररूपी, जया ।
कार्यारंभिं पदां सदा नमित जो तो मेळवीतो जया ॥
माझी सद्गुरु[1]माय दाविति मला ही देवता भक्तिला ।
तीतें मी नमितों, अविघ्न घडण्या ही संतसेवा मला ॥ १ ॥
श्रीलक्ष्मीपति व्यंकटेश[2] तशि ही आई, यमाई[3], तुका ।
आनंदें कुल रक्षुनी बघति त्या प्रेमें स्वयें कौतुका ॥
खंडेराय[4] सपत्नि येउनि गृहीं राही प्रमोदें अती ।
प्रार्थीतों चरणीं तयां नमुनि, द्या सत्संगती सद्गती ॥ २ ॥
गंगा सजननी, सुधी परम तो गोविंद माझा पिता ।
साधु श्रीगुरु[5] बालकृष्ण, त्रिजगीं दासासि संरक्षिता ॥
भावें मी नमितों तया, विनवितों आनंददा सत्पदां ।
द्यावा संतसुसंगलाभ मजला वारोनि पापापदा ॥ ३ ॥

**चित्रबंध** ( चामर )

ज्ञान नाहिं कांहिं पूजनादि तें करावया ।
नाम नाहिं येत बा, मुखीं हरी स्मरावया ॥
दे मती गुरूवरी धरावयास चामरा ।
याविना कळे न भक्तिमार्ग यास दूसरा ॥ ४ ॥

---

१. श्रीसाधु बालकृष्णमहाराजांनीं गणेशमंत्राचा उपदेश दिला आहे. २. श्रीलक्ष्मीपति व्यंकटेश. ३. यमाई-तुकाई; रासीन येथील ह्या कुलदेवता आहेत. ४. श्रीम्हाळसापति पाहुणा जेजुरीहून येऊन राहिला आहे. ५. श्रीब्रह्मस्वरूप साधु बाळकृष्णमहाराज हे मोक्षगुरु आहेत.

## चतुर्गुच्छमालाबंध (स्रग्धरा)

गावें ध्यावें जिवें श्रीगुरुपदकमला लाभदा, पाप नाशी ।
पाहीं नाहीं नहीं बा! कृति सुगम अशी शीघ्र सिद्धा जनांसी ॥
तारी वारी हरी तो अखिल भवभया, याचिती ह्यास भक्त ।
यासाठीं सार साधा, सरळचि पथ हा व्हावया सत्य मुक्त ॥ ५ ॥

(शार्दूलविक्रीडित)

वेगीनाडकुलीं[1], सुमंगल दिनीं पेरूभटाला[2] सुत ।
लक्ष्मीकुक्षितुनी[3] सुरत्न निपजे, ज्या दिव्यता अद्भुत ॥
त्या तैलंग[4] द्विजातिख्यात कुलिं, ज्या वाणी[5] न सोडी पहा ।
झाले पूरुष[6] थोर आजवारि त्या वंशींहि दाहा[7] महा ॥ ६ ॥

(अंजनीगीत)

म्हणती ज्योतिर्विद, विख्यात । होइल, लक्ष्मी! जगन्नाथ ॥
इहपर साधिल कीं तव पुत्र । उच्चीचे ग्रह या ॥ ७ ॥

(साक्या)

ईशदयान्वित वृद्धिंगत हो बुद्धिमंत सत्पुत्र ।
विद्धन दानार्थी आरंभी पिता तयाचा पात्र ॥
बोधित भांडारा, सांठविं या, हो तुज थारा ॥ ८ ॥

---

१. पंडिताच्या कुलाचें नांव "वेगीनाडकुल" आहे. २. पंडिताच्या पित्याचें नांव 'पेरम' किंवा 'पेरूभट्ट' असें होतें. ३. लक्ष्मी हें नांव पंडिताच्या आईचें होतें. ४. हे तेलंगी ब्राह्मण होते. ५. सरस्वती. ६. पूरुष=पुरुष. ७. त्या कुलांत जगन्नाथाच्या पूर्वीं दाहा पिढ्यांत महान् विद्वान् रत्नें निर्माण झालीं. या घराण्याचा लौकिक काशीपासून रामेश्वरापर्यंत एकसारखा गाजत होता. पंडितरायांच्या घराण्याचा असा मान होता कीं, त्या प्रांतांत एका वेळीं, यांच्या घराण्यांतील कोणी पुरुष सभेस गैरहजर असल्यास त्याचें आसन सर्वांच्या मध्यभागीं मांडून, त्या जागेस सर्वजण नस्कार करून मग कामास सुरुवात करीत असत. सारांश, विद्वत्तेसंबंधानें यांच्या घराण्याची बरोबरी करणारा कोणी विद्वान् सगळ्या हिंदुस्थानांत त्यावेळीं नव्हता.

उपनयनादिक संस्कारहि अत्यल्प वयांतचि झाले ।
कुलीन सुंदर वधू बघुनियां लग्न तयाचें केलें ॥
द्वादशअब्दांतीं । झाली अन्याश्रमप्राप्ती ॥ ९ ॥
वेदशास्त्रसंपन्न सुधी तो पंडित झाला नाथ ॥
उत्तम वक्ता पाहुनि मानिति प्रमोद माता तात ॥
ईशदत्त बुद्धी । प्रकटे, हीच पुण्यसिद्धी ॥ १० ॥

( कटाव )

पेरुभट्टसुत,–जगन्नाथ, विख्यात जहाला–जगांत साऱ्या,–गाताती जन, जयास निशिदिन, पुण्यशील जगिं, धन्य मान्य कुल, अनुकूल सुमति, वर्णनीय अति, असेच रीती, वर्तन सत्पथिं, सज्जन वर्णिति, विद्वज्जन किति, याच कुलामधिं, प्रसिद्ध झाले, केलिसदन हें सरस्वतीचें, ज्या ईशाचें, सहाय्य साचें, सत्पुरुषाचें, अनुगृहित कुल, म्हणुनि यशाचें, भांडारगृह, पंडितास त्या ग्रह उच्चीचे, म्हणोनि विद्या संग्रहिं, विग्रह जयास नाहीं, ज्ञान साग्र तरि आग्रहिं निग्रह, शुद्ध कल्पना, वैदिक धर्मा, मंडन करण्या, वितंडवादा खंडण करण्या, अग्रेसर हा जगांत एकचि, समग्र म्हणती ऐसे लोकचि, शांत प्रकृती, सत्यपणास्तव उग्र भासती, " जगन्नाथराया, तुजवरि सत्याचि ईशदया " ॥ ११ ॥

अल्पवयामधिं सुधी सुविद्या, संपादन करि, वेदशास्त्रादिक साहित्या, काव्यकल्पना, ईशदत्त ही खचितचि जाणा, पदलालित्यहि सुंदर कविंना, कधिं साधेना, अशि ती कविता, अलंकारयुत साधी ज्ञाता, विरचित त्याची ग्रंथमालिका,[२] त्यांचीं नांवें कथितों ऐका, " अमृतलहरी, पीयुषलहरी, लक्ष्मीलहरी, करुणालहरी, सुधालहरीहि, आसफ–भामिनि, विलास

---

१. पंडितरायाची इ. स. १६३० पासून १६५९ पर्यंत कारकीर्द उत्तम होती.
२. पंडितरायांनीं आपल्या घराण्याच्या पूर्वापार लौकिकास साजतील असे बारा तेरा ग्रंथ उत्तम तयार केले, त्यांची त्यायोगानें चोहींकडे प्रसिद्धि प्रस्तुतः जाहली. यांनीं आपल्या ग्रंथास दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाचा आधार घेतला नाहीं. या निस्पृह पंडितानें आपलें तयार केलेलें पुस्तक चांगलें झालें अथवा वाईट झालें,

दोन्ही, चित्रमिमांसाखंडण पाही, मनोरमेचें कुचमर्दनही, यमुनावर्णन, जगदाभरणहि, प्राणाभरणाहि, रसगंगाधर, अतितरसुंदर, " जगन्नाथ रचि या लीन सदां जो हरिपायां ॥ १२ ॥

(शार्दूलविक्रीडित)

माता ती सुभगा, सुधी जनकही, पंचत्व[1] पावे, पहा
दुःखारंभ, वयास वीस वरुषें झालीं न, हो तो! अहा! ॥
काळानें गिळिलें सुपत्नितनया, राहीच तो एकला!
औदार्यें त्यजुनी गृहादिक म्हणे लोपे प्रपंची कला ॥ १३ ॥

(ओवी)

पर्यटणा निघे पंडित । संचार करी, सद्बोध करित ॥
सर्वां ठिकाणीं प्रिय अत्यंत । विद्याबळें जाहला ॥ १४ ॥

(दिंड्या)

किती, पंडित अवलोकिं राजधान्या । देति नरपति बहुमान तया मान्या ॥
फिरतफिरतांना येइ जयपुरांत । मान पावे तेथेंहि द्विजवरांत ॥ १५ ॥
येइ ठेवुनि आदरें भूप त्याला ॥ नाथ स्थापी धर्मार्थ पाठशाला ॥
छात्रवर्गाला शिकवि देवभाषा ॥ मनीं धरुनी अत्यंत मोदतोषा ॥ १६ ॥

(ओवी)

नृप शाहजाहां दिल्ली शहरीं । विख्यात न्यायी राज्य करी ॥
काजी विद्वान एक दरबारीं । बहुमानें वर्ततसे ॥ १७ ॥

(भुजंगप्रयात)

नृपा काजि प्रार्थी अती नम्रभावें । महत्कार्य होईल हें त्वत्प्रभावें ॥
गती वेदशास्त्रामधें पूर्ण माझी । करावा मला वाद वाटे समाजीं ॥ १८ ॥
वृथा धर्म निर्मूल हिंदूजनांचा । वदे तो 'मना[2] ये तसे सर्व नाचा' ॥
प्रभुप्राप्तिचा मार्ग तेथें न कांहीं । म्हणोनी मिळेना तयां स्वर्ग पाहीं ॥ १९॥
मला सर्व ठावा असे हिंदुधर्म । तसें जाणतों मी तयांचें स्वकर्म ॥

---

हेंही कोणास न दाखवतां एकदम मनांत येणारे विचार शिष्यांना सांगून लिहविण्याचा प्रवात जारीनें ठेविला होता. १. मरण. २. मनःपूतं समाचरेत्.

[library stamp]

मला वाटतें वाद शास्त्रीजनांशीं । करोनी जगीं मेळवावें यशासी ॥ २० ॥
अम्हां जिंकितां धर्म तो अंगिकारूं । तया जिंकिलें कीं, स्वधर्मेंच तारूं ॥
प्रतिज्ञा कळों द्या नृपा, सर्व लोकां । सभास्थानिं ज्ञानासि माझ्या विलोका ॥

(मालिनी)

नृपति कळवि साऱ्या क्षेत्रवासी जनांसी ।
कठिण पण करी हा काजि, जिंका तयासी ॥
अभिमति निजधर्मीं रक्षुनी स्वप्रभेसी ।
अनुमति[1] समजूं द्या, योजितों मी सभेसी ॥ २१ ॥

( अभंग )

काजीची प्रतिज्ञा, ती राजाज्ञाद्वारें । जगांत पसरे, तत्कालचि ॥ २३ ॥
कुंभकोणक्षेत्रीं, काशीरामेश्वरीं । चिंतातुर भारी, विप्रजन ॥ २४ ॥
एकचि वादाला, राजाच्या सभेंत । धीट जगन्नाथ, म्हणताती ॥ २५ ॥
जिंकील काजीला, सोडा काळजीला । शारदेनें दिला, वर जया ॥ २६ ॥
वरदत्त वंश, विद्येचें मंदीर । ईशदया थोर, यश तेथें ॥ २७ ॥
ह्यावीण दुसरा, काजीच्या समोर । कोण जातो थोर, विद्याबळें ॥ २८ ॥
सर्व क्षेत्रस्थानीं, शोधोनी काढोनी । नृपासी जावोनी, कळवीलें ॥ २९ ॥
आमुचा पुढारी नृपा, जगन्नाथ । त्यामागें समस्त, आम्ही आहों ॥ ३० ॥
आजी तो वसतो, जयपुरामाजीं । सभेस तो राजी होतां सांगा ॥ ३१ ॥

( अनुष्टुप् )

ऐसें ऐकोनि ही वार्ता, कळवी भूप पंडिता ॥
उत्तरा देइ तो ज्ञाता, मी येतों वर्ष संपतां ॥ ३२ ॥

( ओव्या )

अब्द[2] होतां तें संपूर्ण । कसें होईल धर्ममंडन ।
यवनी धर्मांचें ज्ञान । म्हणे पंडित मज नसे ॥ ३३ ॥
अविचारें मी वचनबद्ध । काजी संस्कृतज्ञ प्रसिद्ध ।
म्हणोनि वादार्थ झाला सिद्ध । मज न कळे धर्म यवनी ॥ ३४ ॥

---

१. अनुमोदन. २. वर्ष.

( दिंड्या )

असा चिंतातुर फार जगन्नाथ । तया कालीं पातला अकस्मात ॥
फकिर, तेजस्वी, सिद्ध, वृद्ध, शांत । राहि मागोनी भीक जयपुरांत ॥३५॥
पाठशालेमधिं नित्य फकिर जाई । पाहि संस्कृत तेथील ती पढाई ॥
पाठ देई कधिं पुढें पंडितांच्या । वदे शिशुंला[1] तो गोष्टि नित हिताच्या ३६
नित्य क्रम हा ठेविला फकीरानें । पुसे पंडित त्या नांव आदरानें ॥
म्हणे, विद्या येतात किती भाषा । कथा, साई ! राहणें कोण देशा ॥ ३७ ॥
देवभाषा आपुली शुद्ध खासी । वेश फकिरी हा असे पुण्यराशी ॥
दिसे अनुपम मज तपस्तेज साई ! । धर्म ज्ञाती नच कळे परी कांहीं ॥३८॥
धर्म इस्लामी[2], जात मुसलमान । मुख्य धर्माचा ग्रंथ तो कुरान[3] ॥
नाम कादर[4], घरदार नसे कोठें । मला फिरण्यांतचि म्हणे, मोद वाटे ३९
गती माझी गीर्वाणवाङ्मयांत ॥ काव्यि, वेदांतीं, कौमुदीनयांत, ॥
कुरानादी[5], हादीस[6], तवारीखा[7], ॥ मला अवगतसे सूफिया[8] तरीका[9] ॥ ४० ॥
विविध धर्मांचें तत्व शोधण्यांत ॥ आजवरि मीं वय घालविलें व्यर्थ-॥
नका समजूं हें, 'सख्या जगन्नाथा ! ॥ द्वैत राहीना सार तें पहातां ॥४१॥

( साक्या )

इस्लामी हा धर्म हिंदुला शिकण्या व्यत्यय कांहीं ।
यवनाचार्यें धर्मग्रंथिं त्या कथिला किंवा नाहीं ? ॥
नाथ म्हणे साई ! । कळवा, विनती ही पायीं ॥ ४२ ॥
व्यापक धर्म असे, यामाजीं जाती सर्वहि मिळती ।
सान थोर त्या नद्या सकळही अब्धीकडेच वळती ॥

---

१. आठ वर्षांच्या किंवा सोळा वर्षांच्या आंतील वयाचा मुलगा, शिष्य. २. मोहम्मदी धर्म (इस्लाम याचा अर्थ ईश्वरावर श्रद्धा ठेवणें). ३. कुरआन=ईश्वरी बोल. मुसलमानांचा ईश्वरप्राप्तीचा मुख्य ग्रंथ. ४. शक्ति ठेवणारा, सर्वशक्तिमान् ईश्वर आहे, म्हणून त्याला 'कादर' म्हणतात. येथें कादर हें फकिरानें आपलें नांव सांगितलें. ५. मुसलमानी धर्माचा मुख्य ग्रंथ. ६. मोहमद पैगंबरांनीं जे ग्रंथ लिहिले आहेत, त्यांस हादीस असें म्हणतात. ७. इतिहास. ८. वेदांत. ९. मार्ग.

तैसा इस्लाम । व्यापक साइ म्हणे धर्म ॥ ४३ ॥

( दिंड्या )

धर्म इस्लामी पूर्ण मला ठावा । पंडिता, मी सांगतों त्वां पढावा ॥
सुधी तूतें वश ईशदया, वित्त । कीर्ति करुनी घे त्वरित तूं महींत ॥ ४४ ॥
तुझी नूतन ही, पंडिता ! जवानी[1] । किती मोहक, मृदु, मिष्ट देववाणी ॥
सदाचारी तूं शुद्ध बुद्धिमंत । म्हणुनि मन्मनिं तव प्रेम हें अनंत ॥ ४५ ॥
स्वधर्मामधिं वर्षांत निपुण केला । मनापासुनि दे दुवा[2] पंडिताला ॥
म्हणे केला स्वाधीन जय पुरीनें[3] । दिलें यश मज त्या सहज श्रीहरीनें ॥४६॥

( ओव्या )

ऐसें बोलूनि फकीर । निघे तेथोनि सत्वर ॥
जातां म्हणे विजय थोर । तुजकडेची जाण ना ॥ ४७ ॥
ईशचरणीं प्रेम ठेवा । विसरूं नये कधीं देवा ॥
यशश्री वरी तेव्हां । शुद्ध सत्व पाहुनी ॥ ४८ ॥

( अनुष्टुप् )

कधीं फकीर गेला तो, कळे कोठें न पंडिता ॥
राजदूत तया शोधी, सांपडे नच धुंडितां ॥ ४९ ॥

( भुजंगप्रयात )

उदासीनता ये जगन्नाथजीला । वदे, साइ ! शिष्या तुम्ही कां त्यजीला ॥
कसे गुप्त झाला मला सोडुनीयां । त्वरें दाखवा एकदां आज पायां ॥ ५० ॥
मला बा, सुविद्या तुवां अर्पिली जी । फलद्रूप ती दक्षिणेवीण माझी ॥
कसी हो ? म्हणोनी तुला प्रार्थितों कीं । त्वरें येउनी दीनदासा विलोकीं ॥ ५१
ध्वनी कर्णि आला असा त्याच कालीं । तुला मीं सुविद्या सख्या ! दान केली ॥
दुवा दक्षिणा देउनी पूर्ण, नाथा । जहालों वचांतून मी मुक्त आतां ॥ ॥
असें ऐकतां फार आश्चर्य वाटे । सुनेत्रांतुनी अश्रु ये, कंठ दाटे ॥
इथें घेउनी रूप तें मानवाचें । असे देव आला वदे हेंच वाचे ॥ ५२ ॥

---

१. तारुण्य. २. आशीर्वाद. ३. जयपुरीनें जय स्वाधीन केला, असा अर्थ.

(अनुष्टुप्)

ईशेच्छा ती दिसे ऐसी, यश द्यावें सभे मला ॥
फकीररूपें येऊनी, विद्या देऊनि जाय तो ॥ ५४ ॥
कळतें मज तेव्हां हें, सोडितों तरि पाय कां? ॥
जन्ममृत्यु नको ऐसें, प्रार्थितों लोकनायका ॥ ५५ ॥
आतां खेदांत बैसूनी, काय होणार? तो वदे ॥
भाग्यहीनच मी सत्य, धरिले पाय ना मदें ॥ ५६ ॥
राजद्वारें कळवी तो, दिल्लीधीशास पंडित ॥
कळवा, मी सिद्ध वादा, त्या काळीं प्राप्त दिल्लित ॥ ५७ ॥

(भुजंगप्रयात)

नृपा हें कळे जेधवां दिल्लिमाजी ॥ विवादा तिथी योजि विद्वत्समाजीं ॥
निमंत्री सुविद्वज्जनां पत्रिकांनीं ॥ दिली मान्यता वैदिकांतांत्रिकांनीं[1] ॥५८॥
सभास्थान विस्तीर्ण निर्माण केलें ॥ अनेका प्रकारें बहू शोभवीलें ॥
मधें स्थापना होत सिंहासनाची ॥ खरी साधि पृष्ठीं[2] पहा दिव्य प्राची॥५९
जगन्नाथ उच्चासनीं सव्यभागीं ॥ तसा काजि वामांगिं तो त्या प्रसंगीं ॥
स्थलाची करी योजना याच रीती । नयाचीच[3] भासे सभा सज्जनां ती ॥६०

(मालिनी)

युवति सुमति ऐशा योषितां[4] राजमान्या ॥
कुशलबहु सुशीला, भाग्यशाली सुधन्या ॥
बसतिल अशिं स्थानें केलिं ऐकावयातें ।
बघतिल नच कोणी रूप आणि वयातें ॥ ६१ ॥

(अंजनीगीत)

जगन्नाथा भूपवरानें । शहरिं आणिलें सत्कारानें ॥
व्यवस्थाहि बहु थाटानें । ठेवियली त्यांची ॥ ६२ ॥
पंडितजन ते गोळा झाले । काशीरामेश्वरचे आले ॥

---

१. सर्व विद्यावेत्त्या पुरुषांनीं. २. पश्चिमेकडे त्यांचा 'किब्ला' आहे म्हणून तिकडे तोंड करणें त्यांस शुभप्रद आहे; यासाठीं त्यांनीं प्राची पाठीमागें साधली. ३. न्याय. ४. स्त्रिया.

तीन हजारांवरती जमले, दिल्ली शहरांत ॥ ६३ ॥
शाह[1] करी बहु तत्सत्कारा, मानुनि त्यांच्या अत्युपकारा ।
काजी परि करि तिरस्कारा, पाहुनि बहु माना ॥ ६४ ॥
शाहजाहां करि हा हुकुम[2], दुखविल मन तें न करा काम ।
ब्राह्मण सारे पवित्र परम, न छळा अजि त्यांना ॥ ६५ ॥
स्नानसंध्याकर्मामाजीं, अंतर आणितिल कसे नमाजी[3] ।
छळतिल कोणी लुच्चे पाजी, शिक्षा त्यां करिन ॥ ६६ ॥
सभेस आले शास्त्रिपुराणिक, आलेम[4], फाजेल, मौलवि, नेके[5] ।
दशसहस्रांवराति वेंचक, जन तेथें जमले ॥ ६७ ॥
सुंदर शाहण्या राजयोषिता, प्रमुख लवंगी[6], नृपवर[7]दुहिता,
घेउनि भानुमती[8] ती माता, सखियांसह आली ॥ ६८ ॥

(आर्या)

तेव्हां सभेंत काजी, आरंभी पूर्वपक्ष तो ज्ञानी ।
घेउनि राजाज्ञा ती, ज्ञांतीचा[10] श्रेष्ठ पूर्ण अभिमानी ॥ ६९ ॥
स्थापुनि स्वधर्म काजी, जिंकाया श्रेष्ठ ब्राह्मणां गरजे ।
माहित सर्वां पोकळ, गर्वाचें सर्वदा असे घर जें ॥ ७० ॥

(अबयात)

मुसलमानी[11] मुसलमांको हय लाजम ॥

---

१. नृप. २. आज्ञा. ३. नमाज पढणारे (कर्ममार्गी). ४. विद्वान्, जाणणारा, ४. आलेम, फाजेल, मौलवी या तिन्ही पदव्या विद्येच्या योग्यतेवर योजिल्या आहेत म्हणून शब्दार्थ दिला नाहीं. ५. भले. ६. राजकन्या सुंदरी (मुख्य नायिका). ७. प्रसिद्ध दिल्लीचा राजा. ८. कोणी ही राजकन्या असल्याचें म्हणतात, व कोणी दासी म्हणूनही उल्लेख करितात. ९. लवंगीमाता. १०. जातीचा. ११. मुसलमानांस मुसलमानी त्या वेळीं योग्य आहे कीं, जेव्हां ते जगन्नियंता एकच आहे असें समजतील. 'कुलहु अल्लाहु अहद' याला शिकून त्याचा अर्थ व भावार्थ पूर्णपणें समजून घेतला पाहिजे. खुदा (स्वयंभू परमेश्वर) म्हणतो, म्हण एकच अल्लाह (निराकार ब्रह्म) आहे. आणि त्याचा साहाय्यकर्ता दुसरा कोणीही नाहीं. अर्थात

के समझे एक हय खल्लाके आलम ॥ ७१ ॥
पढे और कुलहो अल्लाहो आहदका ।
समझले मानी व मतलब् भी अच्छा ॥ ७२ ॥
खुदा कहता हय वाहद हय आल्लाह ।
मददगार उस्का नई हय कोई हा शाह ॥ ७३ ॥
नवो जन्ता न उस्को कोई जना हय ।
न हमकुफ उस्का कोई हरगिज़ हुवा हय ॥ ७४ ॥
जो इस मानी व मतलब्‌को समझले ॥
और अपना एतकाद ऐसाहि रखले ॥ ७५ ॥
मुसलमां फिल् हकीकत वहि हय ॥
मुसलमानीसे वरनावो बरी हय ॥ ७६ ॥

(भुजंगप्रयात)

सुपूजा करीती सदा वह्निची[1] हे । परी भस्म होती न जाणूनि मोहें ॥
जरी आपणां शुद्ध हे मानितात । तरी क्रोध दावी तयां विश्वतात ॥ ७७ ॥
जलीं देव ज्यांचा, स्थलीं देव ज्यांचा । असे वस्तु साऱ्या पहा देव ज्यांचा ॥
अशा मुश्रिकां[2] दोजखी[3] मी करीतों । वदे कीं कुरानीं खुदा[4] यापरी तो ॥७८
बघा देव बोरेंहि उच्छिष्ट खातो । म्हणे दाखवा पत्निच्या त्या मुखा तो ॥
फिरे शोकिं जो संसृतीमाजि[5] राम । तया मागती हे गती, मोक्ष, काम ॥७९

---

तो स्वयंभूसिद्ध आणि स्वतंत्र आहे. त्याच्यापासून कोणी जन्म पावत नाहीं. म्हणजे जारज सृष्टि त्याच्यापासून झाली नाहीं. आणि तो कोणापासून जन्म पावला नाहीं. अर्थात् त्याला कोणी मातापिता नाहीं. तो स्वयंभू आहे. त्याचा कोणी संबंधीही नाहीं. या भावार्थाला जो कोणी समजून त्यावर विश्वास ठेवितो, तोच खरोखर मुसल्मान आहे; यावर ज्यांचा विश्वास नाहीं ते मुसलमान नाहींत.

१. अग्नि. २. एका ईश्वरावर दृढभाव न ठेवणारे, कोणालाही ईश्वरांत समाविष्ट करणारे. स्पष्टार्थ-मूर्तिपूजक हिंदु लोक. ३. नरकवासी. ४. स्वयंभू, मालक, ईश्वर. ५. ईश्वरी मायेपासून जीवांनीं उत्पन्न व्हावें, अनेक सुखदुःखादि भोगावीं,

दुजा कृष्ण मोठा दधिक्षीर चोरी । करी भ्रष्ट साऱ्याच ह्या ग्रामनारी ॥
तसे पूजिती हे सुभावें स्त्रियांना । नमा याहि देवी, वदे शास्त्र यांना ॥८०॥
असा धर्म निर्मूळ हिंदूजनांचा । वदे तो "मना ये तसे सर्व *नाचा"॥
प्रभुप्राप्तिचा मार्ग तेथें न कांहीं । म्हणोनी मुकायाहि जाते फुकाही ॥८१॥
कुरानावरी ठेवुनी सत्य भाव ॥ भजा एक अल्ला[10]ह जो मुख्य देव ॥
जयें दाविला मार्ग, त्या मुस्तफ़ा[11]ला ॥ स्मरा, सोडुनी द्या जपाला तपाला ॥
तुम्हांलाहि देईल अल्ला[12] बिहश्त[13] । नका जोडुं मूर्तीपुढें व्यर्थ हस्त ॥
तया फोडितां मूर्ति विच्छिन्न होती । जळे अग्नितोंडींच देतां, अहो! ती ॥८३
कधीं देव कोठें जळाला, गळाला । निराकार केव्हां नसे तो पळाला[14] ॥
जया हस्त ना पाद, त्याला अगण्य[15] । शिरें बोलतां पादहस्तादि; धन्य! ८४
अरूपासि [16]आरोपितां व्यर्थ रूपें । करूनी स्वहस्तें विचित्रें [17]स्वरूपें ॥
तया देव मानूनि भावें स्तवीतां । मती चित्र[18] वाटे; प्रभूला न भीतां ॥८५॥
कुरानावरी ठेवुनी सत्य भाव । भजा एक अल्लाह जो मुख्य देव
स्विकारा तुम्ही धर्म हा [19]मोमिनांचा । बघा थाट तो स्वर्गीच्या वैभवाचा ८६

(आर्या)

देई उत्तर पंडित, ऐकुनि वचना तया सभेमाजी ।
परिसा आतां काजी! स्वस्थ मनानें विनंति ही माझी ॥ ८७ ॥

(गजला अंतरा)

[20]सुँरतुल् ह़ज़रात देखो तुम् उसीमें क्या लिखा हय वो ॥

---

मरावें, इत्यादिरूप जो व्यवहार तो; इहलोकींची जी अचिर स्थिति ती. ७. मनोगतार्थ सिद्धीस जाण्याचा उपाय. ८. जन्ममरणापासून सुटका, मुक्ति. ९. इच्छा. १० निराकार ब्रह्म. ११. शेवटचा मोहमद पैगंबर. १२. अल्ला=संस्कृतांत मातेला म्हणतात. १३. स्वर्ग. १४. निराकार ब्रह्म पळत नाहीं; तुमचा कृष्ण देव पळाला होता म्हणून तो ईश्वर नाहीं, असा खोंचून बोलण्याचा अर्थ. १५. गणना करितां येत नाहीं. * मनःपूतं समाचरेत्. १६. ज्यावर जो धर्म नाहीं, त्यावर त्या धर्माचें बळेंच स्थापन करणें. १७. मूळ स्वभावानें. १८. आश्चर्यकारक. १९. इमान आणणारा. २० कुर आन–'सुर तुल्ल ह़ाजरात, अयत १०, पारये ह़ामीम, या ऐयो हल्

पारये हामीम सिखो तुम् उसीमें क्या लिखा हय वो ॥ ध्रु० ॥

(दोहरा)

इलाहीका कलाम हय, लाये लोक इमान ॥
न करे थट्टा कोई कोम, किसी कोमसे जान ॥ १ ॥

सुर तुल् हजरात देखो तुम्, उसीमें क्या लिखा हय वो ॥ १ ॥
शायद बेहतर उससे हो, यहन मालुम् होय ॥
बिबीयां किसि बिबीयोंसे, न करे थट्टा कोय ॥ २ ॥

पारये हामीम सिखो तुम् उसीमें क्या लिखा हय वो ॥ २ ॥
अयब लगाबन आपसमें बदनाम करो किसि ॥
अल्काब बुरे के साथ, जिससे होय हासि ॥ ३ ॥

सुरतुल् हजरात देखो तुम्, कहे पंडत सभामें वो ॥
पारये हामीम सिखो तुम्, कहे पंडत सभामें वो ॥ ३ ॥ ८८

(दोहा)

करना निंदा किसीकी, हिंदुशास्त्र कहे पाप ॥
हम दुखाकर दिल् किसीका, लेते कभी न शाप ॥

(गजल अंतरा)

सब मज हब को अल्लानें दरीं आलम बनाया हय ॥
किसे बूरा कहूं अच्छा जिसीका उसने पाया हय ॥ ध्रु०॥८९॥

**पद** ( शारदे०-या चालीवर )

अल्ला ह, त्याच ब्रह्माला, लोकपाळाला, म्हणति वदे नाथ ।

---

लजिना, आ मनु ला यसखर, कौमुम् मिन् कौमिन्, असा ऐं यकूनु, खैरम् मिन् हुम्, वला निसाउम्, मिन् निसाइन्, असा ऐं यकुन्ना खैरम् मिन् हुन्ना, वला-तल्मेजू अन् फोसाकुम्, वला तना बजुबिल् अलकाब--

१. **अर्थ**–इमान आणलेल्या लोकांनो ! कोण्या जातीची कोणीं थट्टा करूं नये. कदाचित् ते त्यापेक्षां जास्त योग्य असतील. कोणींही स्त्रियांनीं कोणा स्त्रियांची थट्टा करूं नये. न जाणों ते त्यांच्यापेक्षां योग्य असतील. आपसांत कोणाला दोष लावूं नका आणि वाईट शब्दांनीं बदनाम करूं नका. २. जगांत.

तो रब्बुल[१] आलमीं सिद्ध कुरानांत ॥ ध्रु० ॥
तो ईश, तोडि भवपाश, नेई धामास, पाहिना जात ।
त्याचींच लेकरें पाह सर्व जगतांत ॥
ती माय, धरीतां पाय, घालि अन्याय, सर्व उदरांत ।
तिजवांचुनि जगिं या कोण क्षमावंत ॥ चाल—
प्राचीन धर्म वेदाचा, आमुचा, तारक तोचि असे साचा,
आमुचा, सोडोनि मार्ग पूर्वींचा, आमुचा
कां तरी, जाती बाहेरी, होऊं श्रीहरि, करितो हीत ॥
जो वर्णाश्रमधर्म चालवी महित ॥ १ ॥ १० ॥

(गजल–चाल–वैशाख मास० )

'अल्लाह' जो प्रसिद्ध तोच ॐही असे ।
सिद्ध[२] परमशुद्ध परब्रह्म एकसे ॥ ध्रु० ॥
माय[३], आब[४], पाणि, जल[५]हि अनेक शब्द हे ।
अर्थपूर्ण एक वस्तु, भिन्न कां आहे?
पृथक सर्व भाषा त्या, जाण मर्म हें ।
सद्गुरुविण सत्य नित्य कळे तरी कसें? ॥ १ ॥
शांत होय तृषा 'माय[६]' म्हणुनि तें पितां ।
नीर[७] म्हणुनि पीतां कां होय ऊष्णता ?
विषहि नाम देउनि त्या जरि हो प्राशितां ।
फल तुम्हां तसें चि मिळे त्यामध्यें जसें ॥ २ ॥
कोणी स्त्रीलिंगिं, पुल्लिंगिं, बोलती ।
नपुंसकत्व त्यावरी कोणि स्थापिती ।

---

१. जगत्पालक हेंच नांव सुरेफ़ाहातेमध्यें ईश्वरानें आपणास घेतलें आहे. मी मुसलमानांचा पालक आहे असें म्हटलें नाहीं. यावरून तुमचा व आमचा पालक तोच. २. अनंतकाल राहणारा. ३. अरबी भाषेंत 'माय' पाण्यास म्हणतात. ४. फारसी भाषेंत पाण्याचें नांव आहे. ५. जल- पाणी. ६. आरबी नांवानें अथवा 'माय'--आई म्हणून तें पीतां तृष्णा शांत होय. ७. उदक.

परी न खरें कळत कुणा, गूढ तें अती ।
होय, 'जसा रंग मिळे, तोय तें तसें ॥ ३ ॥
चतुष्कोण, अष्टपहलु, हौद बदामी ।
जल, चल, तद्रूप तिथें पाहवें तुम्हीं ॥
जलबिंदु मौक्तिकवत दिसत नेहमीं ॥
नीर निराकार साकार तें दिसें ॥ ४ ॥
शब्दजाल भ्रांतिमूल[1] भुलुनि नच राहा ।
"कुल्ले[2] शइन मोहित" ब्रह्म व्यापकू महा ॥
ब्रह्मांड पूर्ण भरुनि उरे अंगुलें[3] दहा ।
साकार निराकार अंतिं एक तो वसे ॥ ५ ॥ ११ ॥

(आर्या)

अल्लाह ओम् हि एक चि, दाविन मी, सर्व सभ्य पहा ।
मन्मनिं सुतोष वाटे, पाहुनि सन्मति गुणज्ञ बहु नृप हा ॥ १२ ॥

(ओवी)

अकार[4] आणि उकार। अंतिं ज्याच्या मकार ॥
या त्रयवर्णी ॐकार । अल्लाह शब्दांत तीन वर्ण ॥ १३ ॥

(बयत)

से[5] हरफी हये दर अस्ल अल्लाह का नाम ।
अलिफ, लाम, हय और हे, लाक लाम ॥ १४ ॥

---

१. पदार्थाचें जें खरें स्वरूप असतें याचा बोध न होतां त्या पदार्थाचे ठायीं पदार्थांतरत्वेंकरून जें ज्ञान होतें तें. २. 'कुले शइन मोहित' कुरानांतील वाक्य आहे. याचा अर्थ असा आहे कीं, सर्व वस्तूंला ज्यानें घेरलें आहे असा. ३. "स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ।" ऋग्वेद, पुरुषसूक्त. ४. अकार उकार, मकार, या तीन वर्णांनीं युक्त ॐकार आहे तसाच. ५. तीन अक्षरांनीं युक्त अल्लाह आहे. अल्लाहांत अलिफ (अ), लाम (ल), आणि हे (ह) हीं तीनच अक्षरें आहेत,

काजी-- (बयत)

मगर चार हरफी हय तहरीर में ।

के एक् लाम उसमें जियादा लिखे ॥ ९५ ॥

पंडित— (ओवी)

अकार, उकार, मकार तीन, अर्धमात्रा करणरूप जाण ।

चौथी पाहुनि घ्या प्रमाण, शिववचनें सिद्ध हें ॥ ९६ ॥

काजी-- (अबयात)

किताबी व लफ्‌जी मिलावें हुरूफ । तो हो पंज हुरफिका अस्ल वकुफ ॥

अलिफ् और दोलाम और फिर अलिफ् । हुवा हरफ पंजुमसे हे मुतेसिफ ॥९८

पंडितः— (ओवी)

अकार उकार मकार, इकार आणि एकार ।

पंच मातृकाप्रकार, ॐकारांगीं वसताती ॥ ९९ ॥

---

१ काजी म्हणाला—अल्लाह, लिहिण्यांत चार वर्णांचें नांव आहे. एक लाम, (लकार) जास्त लिहावा लागतो.

२ पंडित म्ह०—ॐकारांतही चार मात्राच आहेत. अकार, उकार, मकार आणि अंतीं करणरूप अर्ध मात्रा आहे. यास शिवगीतेचें प्रमाण-- चतस्त्रस्तन्मात्राः स्युरकारो कारको तथा ॥ मकारश्चावसानेऽर्धमात्रेपि परिकीर्तिता ॥ अध्याय १५ पृष्ट ३-६

३ काजी म्ह०--उच्चारावरून अरबी कायद्याप्रयाणें लिहितांना अल्लाहांत पांच वर्ण जाणले जातात. अलिफ (अ) आणि दोन लाम (ल, ल.) दोन लकार व पुनः आलिफ [ अ ] व पांचवें अक्षर हे (ह) अशी पांच अक्षरें आहेत.

४ पंडित—अकार, उकार, मकार, इकार, ऐकार अशा ॐकारांत पांच मात्रा आहेत प्रमाण, कपिलगीता—अध्याय २, पृष्ठ ५.

"अकारश्च उकारश्च मकारश्च त्रिमातृकम्

इकारश्चैव एकारः पंचकं मातृसंज्ञितम्"

ही ओवीही कपिलगीतेच्या टिकेंतीलच आहे.

पंडितः— (अबयात)

अॅलिफ़ इस्म अल्लाहसे निकले अगर ।
पढा जावे 'लिल्लाह' वो बे ख़तर ॥ १०० ॥
अगर एक् लाम उस्से देवे निकाल ।
तो पढीये 'लहु' उस्को बे क़िलोकाल ॥ १०१ ॥
अलिफ़ और दोलाम गर होवें दूर।
तो 'हु' हरफ रहजावे अयजी शऊर ॥ १०२ ॥
हयें लिल्लाह के मानी बराये ख़ुदा ॥
इल्हा भि ख़ुदाको कहे बर मिला ॥ १०३ ॥
'लहु' के हुये मानी अज बहरे ऊ ।
मुराद अज बराये ख़ुदा जान तू ॥ १०५ ॥
हुवा करते हये 'हु' के मानी 'वोही'
इशारा हये अल्लाके जायब सभी ॥ १०५ ॥
गरज़ इस्मे अल्लाह हये इस्मे ज़ात ।
रुजुअ़ उस्के जानब हयें सब मानियात

१. पंडितानीं अल्लाहचा मार्मिक रीतीनें अर्थगौरव केला आहे तो असा—ते म्हणाले अल्लाह हें (बिज्ज़ात) सिद्धनाम आहे. अल्लाहांतील अलिफ (अ) काढिला असतां 'लिल्लाह' शब्द वाचला जातो. त्यानंतर एक लाम् (ल) काढिला तर 'लहु' शब्द राहतो. अलिफ (अ) व दोन लाम (ल, ल.) काढिलें असतां, 'हु' वर्ण शेष र[illegible]ो. अरबींत क़ायदा आहे कीं, शेवटच्या 'ह,स हु वाचतात. पुढें पंडितांना त्या सर्वांचा अर्थ सांगितला तो असा:--लिल्लाह म्हणजे ईश्वराकारितां, 'लहु' चाही अर्थ ईश्वरासाठीं असाच आहे. 'हु' चा अर्थ ईश्वर किंवा तोच. हें दर्शक ईश्वराकडेच आहे सारांश अल्लाह या सिद्ध नामांतून कोणतेंही अक्षर काढिलें तरी ईश्वराचें दर्शक नाम राहतें. कारण अल्लाह हें स्वयंभू नाम आहे.



या म,मध्यें ही शून्याकृति

उ, ला उलट केले असतां ल, होतो 'अल्लाह' मध्यें उ, उलट होऊन ल,चा उच्चार झाला आहे.



चतुष्कोन आहे.

हें वर्तुलाकार चिन्हहि शून्याकारच आहे.

(ओव्या)

ॐ[1]कारांत आद्य अकार । मध्यें जयाच्या उकार ॥
अंतीं त्याच्या मकार । तीन देव तीं वर्णीं ॥ १०७ ॥
अकारांत विष्णुदेव । उकारांत ब्रह्मदेव ।
मकारांत जाण शिव । यथार्थ हेंचि जाणिजे ॥ १०८ ॥
विष्णु हा देव पालक । ब्रह्मदेव उत्पादक ॥
शिव जाण विनाशक । सृष्टिचालक सर्वही ॥ १०९ ॥
ब्रह्मा विष्णु महेश । म[2]कारांत समावेश ॥
काढितां ऐसा श्लेष । एकरूप सर्वही ॥ ११० ॥

(अनुष्टुप्)

अ[3]ल्लाभिवंदनीं दोष दिसेना कांहिं तो पहा ॥
वे[4]दशास्त्रपुराणीं जें कर्तव्या मानिलें महा ॥ १११ ॥

पद (चाल-गजल)

अखिल जन हो, तुम्ही केव्हां स्वधर्माला नका सोडूं ॥
मनोभावें भजा देवा, स्वधर्माला नका सोडूं ॥ ध्रुव० ॥
धर्मज्ञातीकुलरीति तुम्ही परमादरें पाळा ॥
आलिं जरि विघ्नें किती जीवा, स्वधर्माला नका सोडूं ॥ १ ॥
कृष्णोक्ति मनीं आणा गीतेंतिल ती जि दे मुक्ति ॥
स्वधर्मीं मृत्यु बहू बरवा, स्वधर्माला नका सोडूं ॥ २ ॥
स्वधर्मचि ही असे नौका, भवाच्या या समुद्राला ॥
स्वतां तरुनी दुजा दावा, स्वधर्माला नका सोडूं ॥ ३ ॥
स्वधर्माचार तनुशुद्धि करी पुढें ज्ञानपथ साधे ॥
त्यजा दंभा मदा गर्वा, स्वधर्माला नका सोडूं ॥ ४ ॥

---

१. तसाच ॐकारांतील प्रत्येक वर्णाचा अर्थ ईश्वराचा दर्शक होतो. तो असा:– अचा अर्थ विष्णु, उचा अर्थ ब्रह्मदेव, मचा अर्थ महादेव. सारांश, तिन्ही देव ॐकारांत आहेत. २. मचा विष्णु, ब्रह्मदेव, महादेव. ३. अल्ला=माता, आई. ४. 'मातृदेवो भव ।' 'न मातुः परदैवतम् ।' इत्यादि.

ज्ञानतीर्थीं बुडी मारा, अती त्वरेनें मनुजदेहीं ॥
इथें साधा मुक्तिपर्वा, स्वधर्माला नका सोडूं ॥ ५ ॥
गुर्वाज्ञा तीच कथितो दास भगवंत हा तुमचा ॥
श्रेष्ठ निजधर्मची सर्वा, स्वधर्माला नका सोडूं ॥ ६ ॥ ११२

पद (गजल)

मनुजजन्मासि येऊनियां, फुका दवडूं नका काया ।
शरण प्रभुच्या रिघा पायां, फुका दवडूं नका काया ॥ ध्रुव० ॥
दिवस जातो वजा होतो, झटपट तें आयु घटतें ।
न मिळतें तें पुन्हा पाहया, फुका दवडूं नका काया ॥ १ ॥
अशी खासी तुम्हां संधी, सुधीजन हो, करीं आली ॥
भजा देवा त्यजा माया, फुका दवडूं नका काया ॥२ ॥
असे हा हाट मोहाचा, इथें वस्तू हि जादूच्या ॥
सकल खोट्या पाहा न्याया, फुका दवडूं नका काया ॥ ३ ॥
अखिल जग हें बरें नाहीं, खरें नाहीं इथें कांहीं ॥
तरेना ही जो मानी या, फुका दवडूं नका काया ॥ ४ ॥
भगवंता बघा आतां, पुढें साधावया कार्या ।
नका घालूं वया वाया, फुका दवडूं नका काया ॥५ ॥ ११३

(इंद्रवज्रा)

भानूमतीची प्रियपात्र कन्या । रामा[1] युवा[2] सुंदर[3] राजमान्या ॥
होती सभेलागिं लवंगि आली । त्या पंडिता पाहुनि लुब्ध झाली ११४

(ओवी)

सौंदर्यें भासला काम[4] । सुरगुरु[5]सम ज्ञान अनुपम ॥
पंडित सर्वांगीं उत्तम, पाहुनी लवंगी मोहिली ॥ ११५ ॥

(चामर)

पाहतां स्वरूप आणि ऐकतां सुघोष तो ।
त्या लवंगिचा अतीव इंद्रियें[6] तोषतो ॥

---

१. मनोहर. २. तरुण. ३. देखणी, मनोरम. ४. मदन. ५. बृहस्पति. ६. मन.

चंचला न धीर त्या, वदे स्वतास घाबरा।
"शीघ्र दास होउनीच वारुं काय चामरा" ॥ ११६ ॥

कवंगी: —
(आर्या)

पंडित हा एक पती, नर त्याविण भूवरील सर्व पिते।
स्वर्मीही तनु स्पर्शा, योग्य न सन्मान्य असति यद्यपि ते॥ ११७॥

पद (चाल—अखिया फरक न लागी रे)

शहाजहां खुष बहु झाला, नृप शहाजहां खुष बहु झाला।
पाठ थोपटुनि म्हणे पंडिता, धन्य अससि सच्छीला॥ १ ॥
अमूल्य[1] अनुपम पंडितरत्ना, शोभसि राजसभेला ॥ २ ॥
अनर्घ्य वस्त्रें अलंकारही, देउनि गौरव केला ॥ ३ ॥
स्वकरें नृपवर नव रत्नांची, अर्पित कंठीं माला ॥ ४ ॥
अन्य विप्रजन तोषविले बहु, देउनि मानधनाला ॥ ५ ।
पुष्प वृष्टि करि भगवंत म्हणे, पंडितविजया बोला ॥ ६ ॥ ११८

[आर्या]

पाहुनि विद्या बुद्धी, सिद्धकल्पना, तशी जनां प्रीती।
वक्तृत्व, विनय, विजयहि, यौवन, सद्रूप, आणि सत्कीर्ती ॥ ११९॥
नृपवर मोहित झाला, गुणगणयुत पंडिता म्हणे राया।
'अवतरलासी तूं कीं, आधारस्तंभ राज्य ताराया ॥ १२० ॥
यासाठीं तूं दिल्ली शहरीं राहूनि, भूषवी माझी।
राजसभा ही, विद्या येइल येथेंचि नित्य कामा! जी' ॥ १२१ ॥
पंडित म्हणे, 'गुणज्ञा, राजाज्ञा ही खरी शिरीं मान्य।
जयपुरपति[2]वचनाच्या, वांचुनि धरितां नयेच स्थल अन्य ॥ १२२ ॥

[ठुंबरी]

ऋणानुबंधें बांधियलें मज, सहजचि गुंतुनी गेलों राया ॥ ध्रु० ॥
तीक्ष्ण प्रकृति लक्षण माझें, लक्ष न दे तो क्षणही सदया ॥ १ ॥
स्वतंत्र वर्तन बरें मानी मन, परवशतेमधिं न टिके काया ॥ २ ॥

---

१. अमोलिक. २. जयपूर नृपति.

वचनीं तत्पर जयपुरनरवर, टिकलों स्वेच्छें शिशु शिकवाया ॥ ३ ॥
नृपति प्रीतिनें मार्गप्रतीक्षा, करित असेल द्या आज्ञा जाया ॥ ४ ॥

[ शुद्धकामदा ]

जयपुराधिशा पत्र पाठवी । तुजसि श्रीजगन्नाथ आठवी ।
गुणगणांसि त्या पाहुनी अती । खचित आमुची मोहिली मती ॥१२४॥
म्हणुनि प्रार्थुनी येथ पंडिता । बहुत आग्रहें ठेविलें स्वतां ॥
दिन बहू तुम्हीं लाभ घेतला । परि गुणी नृपा, पाहिजे मला ॥१२५॥

[ ओवी ]

जयपुराचा नरवर, दिल्लीपतीस देई उत्तर ॥
स्वतंत्र पंडित अतितर, आनंदें जगीं वर्तती ॥ १२६ ॥

[ आर्या ]

स्वेच्छाचारी पंडित, येतो त्यांसीहि आडवा कोण ।
आज्ञाधारक मी हो होतों कीं नृपवराच वाकोन ॥ १२७ ॥
वाडिलांची पुण्याई, दावी ते चरण, दैवयोग भला ।
अब्दद्वय प्रमोदें, म्हणोनि सेवेमधेंच हा निभला ॥ १२८ ॥
सत्सहवास तुटे हा ! वाटे त्याचेंच दुःख फार मला ।
राजसुखाहुनि शतपट, बोधामृतप्राशनांत हा रमला ॥ १२९ ॥
शाहाजाहां खेळीं बुद्धिबळाच्या प्रवीण, ही ख्याती ।
त्याहुनि कुशलचि पंडित, दोघे खेळति सदैव एकांतीं ॥ १३० ॥
नृपदारागारांशचि[1], स्थल तें अतितर सुरम्य, मन सुखवी ॥
क्रीडे भूप सपंडित, तेथें पाही सुलोचना[2] सुकवी[3] ॥ १३१ ॥
सहवासें मानसभूशुद्धि[4], वारि सुधा[5] पडे सुभाषित[6] तें ॥
प्रेमांकुरोद्भवें ये अद्वैत[7]सुफल नृपाकरीं नित तें ॥ १३२ ॥

---

१. नृपस्त्रीमंदिराचा अंश. २. मृगनयना [ लवंगी ]. ३. चांगला कवि [ जगन्नाथ ]. ४. सहवासें मानसभूशुद्धि 'हो' हें अध्याहृत क्रियापद आहे. ५. अमृत. ६. चांगलें भाषण [ सद्विचार ]. ७. द्वैतभाव नव्हे तें; जीवात्मा व परमात्मा यांचा अभेद असें जें मत तें.

दा. 1332

संतोषें काळ क्रमी, कांहीं भेदहि नुरे उभय पक्षीं ॥
पडघांतुनि अभिरामा[१], कमलाक्षी[२] नरवरासि[३] तें लक्षी ॥ १३३ ॥
अनुरूप[४] रूप तरुण, पाहुनि अतिलुब्ध चित्त तन्मय हो ॥
स्थैर्य न मनीं, म्हणे ती मूर्ती डोळयांपुढें सदा राहो ॥ १३४ ॥
गेले षण्मास असे, पाहुनि तें प्रेम वाढलें स्वमनीं ॥
मंगलमय तनु माझी करिल कधीं हा वरूनि श्रेष्ठ, जनीं ॥ १३५ ॥
ऐसें चिंती निशिदिनिं, ध्येय तिच्या मानसीं वसे नाथ ॥
ध्यानीं निमग्न त्याच्या, मानितसे ती तया जगन्नाथ ॥ १३६ ॥
मातेकडोनि येती युवराजांचीं बघावया चित्रें[५] ॥
अनुमतिनें[६] पति वरण्या, ती पाहीना परी तयां नेत्रें ॥ १३७ ॥

(उपचित्रा)

बघत कवीमुखपंकज[७] रामा[८], । वदत, मनोभ्रमराच रिकामा ॥
रव न करी, विधु दैव न भा[९] दे, कधिं न मिळे मधु तोंवरि मोदें १३८॥
बघति कशा वद राजसचित्रा, सुगुणि वरा बघ सात्त्विकपात्रा,
करि अति मोहित त्या मृदुगात्रा, वदतिहि येउनि हें उपचित्रा[१०] ॥१३९॥

(विबुधप्रिया—बहर*, रमल, वाफी, महजुफ)

निश्चया नच सोड, पूर्ण हि कामना तव कामिनी ॥
हो, म्हणे मति बैससी अशि खिन्न कां? धृति[११] सोडुनी ॥
मंत्रनिश्चय, तंत्रनिश्चय, यंत्रनिश्चय, मी स्वयें ॥
जाण तें कर, बोध हा नच तूं मदें बिबुधप्रिये ॥ १४० ॥

---

१. गुलजार, रूपवान्. २. लवंगी. ३. जगन्नाथ. ४. सारखेपणा, उचित, बेताचा. ५. तसबिरा. ६. मान्यतेनें. ७. जगन्नाथाचें मुखकमल. ८. सुंदर, मनोहर [लवंगी]. ९. प्रकाश. १०. सखीचें नांव. ११. धैर्य. * या बहरचें वजन असें आहे [फायलातुन, फायलातुन, फायलातुन, फायला]. विबुधप्रिया या वृत्ताच्या अक्षरगणांसी वरील वजन मिळतें. जसें:—

राधिका, सम—रा, ज नास ज--नास, भास्कर, राधिका
फायलातुन फायलातुन फायलातुन फायला

(सुधा)

भानूमती भेटुनि सुकन्यकेला ॥ त्वां कोणता सांग वर मान्य केला ॥
ऐसें पुसे, येथ पर कोण आहे ॥ लाजूं नको बोल, वर कोणता हें ॥ १४१

(इंद्रवज्रा)

मीं पाठवीली बहु चित्रमाला । तुझा न कोणी पारि मित्र झाला, ।
त्या राजपुत्रांतुनि, कां? पसंत । झाला नसे, एकहि बुद्धिमंत ॥ १४२ ॥
आश्चर्य मातें अति वाटलें, गे । पाहोनि बुद्धी तुझि ही सुते गे,
झालीस योग्या तरि दान देण्या। हे सुंदरी, तूं वारि थोर मान्या ॥१४३

[सुधा]

माझें नसे माय लव चित्त शांत ॥ कैसा करूं सांग धवं मी पसंत ॥
नाहीं 'अये, प्रेम मम राजपुत्रीं ॥ संलग्न मी होइन अती सुपात्रीं ॥१४४॥

[भुजंगप्रयात]

तुझ्या बुद्धिला हें कसें इष्ट वाटे । तुझी स्पष्ट आहे मती भ्रष्ट वाटे ॥
तुवां राजपुत्रांसि चित्रीं पहावें । करूनी पसंती वदायासि यावें ॥ १४५॥

[अभंग]

पाहीन मी वाट, परवांपर्यंत, करी चित्रीं कांत, पसंत तूं ॥ १ ॥
भगवंत तूतें, देवो शुद्ध बुद्धी, होवो कार्यसिद्धी, तुझी बाई ॥ २ ॥
पुढें तुज नाहीं, पुसणार कांहीं, विचार हा पाहीं, वदे माता ॥ १४६ ॥

[इंद्रवज्रा]

पाहीन मी गे वरँ जाण बाई । चालेल तेव्हां न तुझें जराही ॥
'बाळे, वरावा तुज तोचि लागे । जो इष्ट वाटे वर तो मला गे॥१४७

[मालिनी]

अघंभय मज वाटे पाहतां, माय, चित्र ।
मन वारि निजभावें ज्ञानसिंधू पवित्र ॥
नवरि करुनि दे तूं कन्यका पंडिता ही ।
कधिं नच मम बुद्धी भ्रष्ट हो दंडितांही ॥ १४८ ॥

---

१. पुष्कळ चित्रें. २. नवरा. ३. वाटेला. ४. नवरा, पति. ५. जांवाई. ६. पातक.

(इंद्रवज्रा)

वेंचीन प्राणा, न भितें यमाला । नको मला दाखवुं चित्रमाला ॥
आई, असा हा पण मींहि केला । हा जीव कीं एकपदीं भुकेला ॥ १४९ ॥

(मंदाक्रांता)

जाओंद्या हे असु[1], वारिन मी राजपुत्रां न स्वप्नीं ।
अन्याया या कारिल काशि ही पंडिताचीच पत्नी ॥
प्रेमें घालीं सुमन[2] पतिला माळ ज्या त्यास लक्षी ।
लोकां ठावें न तारि, हारि, तूं पाहसी सर्वसाक्षी ॥ १५० ॥
हा हा ! देवा ! तुज विसरलें ! सेविले नाहिं पाय ।
दुःखा देती सकल दुरितें[3] आणि माझे अपाय[4] ! ॥
आतां शोकीं स्मरण करित्यें कोपसी कां म्हणोनी ? ॥
ऐशी बुद्धी कलुषित[5] प्रतीकारि[6] श्रेष्ठास नाहीं ॥ १५१ ॥

(शिखरिणी)

क्षमा तूझ्याठायीं अतिशय सुखें स्थीर वसली ।
कळों आलें तेव्हां हृदयिं भृगुची लाथ बसली ॥
तया चिन्हाला तूं प्रमुख करिसी भूषणिं भला ।
अशी शांती अंगीं तुज असुनि कां कोप शिवला ? ॥ १५२ ॥

(मालिनी)

सुखद प्रभु ! प्रकोपा आवरी प्रेमळा ! तूं ।
प्रविरहप्रखराग्नी जाळितो हा मला; तूं ॥
करिं धरिं वरदा ! बा मायही संकटीं या ।
मजसि रमण दे तो मागणें हेंच पायां ॥ १५३ ॥

(अंजनीगीत)

काढी दिन ती नाथा पाहुनि । सरे न कांहीं केल्या रजनी ॥
अनंगबाणें व्याकुल होउनि । बोले स्वमनीं हें ॥ १५४ ॥

---

१. प्राण. २. उत्तम मन. ३. पातकें. ४. अपकृति. ५. अपवित्र. ६. सूड उगविणारी.

(आर्या)

मदनशरें तप्त तनू, त्यावरि निशिपतिकरें[1] बसे चटका ।
जाणे ईश, हि रात्री घालवितें मी शताब्द परि घटिका ॥ १५५ ॥
बरवा शितांशुपेक्षां[2] चंडांशू[3] तो खरा जगन्नाथ ।
पाहुनि सुशांत दिन त्या जाई, तगमग करीत ही रात ॥ १५६ ॥
चंद्रा, कर[4] शांत मना, शीतल कर[5] तव जगांत ही ख्याती ।
पडतां संकटिं कोणी, सज्जन नर त्या सदैव कर देती ॥ १५७ ॥
कुमुदिनिपति[6] कुमुदांसि[7] विकासवीतो म्हणोनी, बा भ्रमरा ।
गुंजारवें यशा त्या गाउनि देसी सुनंद कां चंद्रा ॥ १५८ ॥
गुंजसि सानंदें तूं, काम तुझा बा! असेल तो शमला ।
विधुमुख[8], विकसित[9] पंकज, रव तंव[10] मधुर हि, न देच तोष मला ॥
'मदना! अबला असि ही छळसी किती तरि, तुला कसें वाटे ।
मज छळतां काय मिळे? दाविन मी, जा त्वरीत त्या वाटे ॥१६०॥
कंदर्पा दर्प कसा[11]? तुज, पाहुनि योगिराज मम शिवें[12], ते ।
सौम्य सुशील; न भीं जा, झालें मज, मी कधीं तयां शिवतें[13] ॥१६१
तुजविण अन्य न, मारा! दूत दुजा परि कथावया माझी ।
दुःखद कथा अतां ही, कामा यावें, सख्याच कामाजी ॥ १६२ ॥
देती सुज्ञ सुविद्यहि, तारायंत्रच मनास या नाम ।
प्रेमीं किंवा द्वेषीं तद्गतिचा हो समान परिणाम ॥ १६३ ॥
सत्य म्हणावें हें जर, आला अनुभव मला तसा नाहीं ।
विरहानल तनु जाळी! माझी, परि प्रियतमा न शंका ही ॥ १६४ ॥

---

१. किरणानें. २. चंद्र (शीतरश्मी). ३. सूर्य (विभाकर). ४. किरण. ५. हात. ६. चंद्र. ७. कमलांना. ८. चंद्रवदन. ९. प्रफुल्लित कमल. १०. तुझे मधुर शब्द, कामीजनांना संतोष देणारे, चंद्रवदन, विकसित कमलें, भ्रमरगुंजारव, असूनही लवंगीस तें सर्व दुःख दायक होतें, असा अर्थ. ११. वाटे हें अध्याहृत क्रियापद आहे. १२. ते माझे शिव [कल्याण करणारे अथवा पति] आहेत, कैलासपति नव्हेत, असा भावार्थ. १३. स्पर्श करितें अर्थात् भेटतें.

प्रेमीं खचित माझ्या आहे न्यूनत्व हें मला भासे ।
यास्तव स्थीर सुमन तें, जाणें मी तत्व सत्य हेंचि असे ॥ १६५ ॥
प्राणाहुनि प्रिय प्रियकर, स्वसुखसदन, वदन पाहतां वाटे ।
मदनचि हा, टाकावी ओवाळुनि यावरोनि तनु वाटे ॥ १६६ ॥
नयनीं मनीं सुमूर्ती भरली माझ्या सदैव परिपूर्ण,
परि अदृश्य असे मी, पाहिल प्रियतम मला कसा तूर्ण[1] ? ॥ १६७ ॥
बघेल मदीय वदना, मन्मनवत तें सुविद्य मन खचित ।
होइल, परि दैव मला आणिल वेळा अशी कधीं उचित ? ॥ १६८ ॥

(भुजंगप्रयात)

असी काढिते रात्र सारी विचारीं । पलंगीं शुभांगी लवंगी सुनारी ॥
प्रभातीं सखी प्रेमवृंदा[2] प्रवेशे । पुसे तूं अशी कां? प्रिये मंजुघोषे! ॥१६९॥
उदासीन कां राहसी? राजकन्ये! । उणें काय आहे? तुला पूर्वपुण्यें ॥
कधीं तूं मला गुह्य तें प्रेमभावें । तुवां मौन कां हें धरावें? स्वभावें ॥१७०

(गजल)

किसि[3] बुत्पे दिल् मेरा आया हुआहै । वले इष्क दिल्में छुपाया हु आहै ॥ ध्रु० ॥ गमो, दरदो, रंजो, अलम्, दुखये सारा, जुदाई में बुत्के कमाया हुआहै ॥ १ ॥ फकत एक बोसा कहीं छुप्के देना, लबेजां फिजा मुज्को भाया हु आहै ॥ २ ॥ इस आजुर्दा दिल्को महीनोंसे मैंने, तहंमुल्का जामा

---

१. लौकर. २. सखीचें नांव. ३. या उर्दू गजलेचा अर्थ असा आहे कीं,—कोणा एका मूर्तीवर माझें मन लुब्ध झालें आहे. परंतु त्याचा छंद मनांत आच्छादित ठेविला आहे. मीं त्या मूर्तीच्या विरहांत दुःख, ताप, क्लेश हें सर्व मिळविलें आहे. मला असें वाटतें कीं, लपून कां होईना त्यानें एकच चुंबन द्यावें. जीवाला आनंद देणारे त्याचे ओठ मला अतिशय आवडत आहेत. मीं या उदासीन चंचल मनाला कित्येक दिवसांपासून समाधानाचें पांघरूण घालून स्वस्थ बसविलें आहे. बहुत दिवसांपासून माझें मन त्याला भेटण्यासाठीं शोधीत आहे. परंतु माझा प्रियतम मला मिळत नाहीं.

पिन्हाया हुआहै ॥ ३ ॥ न मिलता है महबूब दिल्बर हमारा, कई दिनसे दिलूउस्का जोया ॥ ४ ॥ हुआहै ॥ १७१ ॥

(साक्या)

एके दिवशीं नृपवर आणी पंडित एकांतांत ।
बुद्धिबळानें बुद्धिबळातें[1] खेळति आनंदांत ॥
पंडित सुमति अती । पाहुनि मोहित तो नृपती ॥ १७२ ॥
स्मरलें सुरूप निज तनयेचें बोले नृप, हे मान्या ।
पंडितवर्या! आहे माझी लवंगि सुंदर कन्या ॥
वर्णू काय तिला । धीमति सद्गुणि जी सुशिला ॥ १७३ ॥

(आर्या)

सुरलोकींची परि[2] ती, उदरीं माझ्या खरोखरी आली ॥
उपमा देण्या दुसरी, सुंदरि भूवरि नसेच या कालीं ॥ १७४ ॥
अगाध विद्या जशि तव, अनुपम सौंदर्यही तसेंच तिचें ॥
वर्णन करि कविराया, कुशलत्व कळे तरी तुझ्या मतिचें ॥१७५॥
चंद्रमुखी, मृदुगात्री, आली भासे चुकोनि या लोकीं ॥
परकेपणा न पडदा तुजसी, दुहिता मदीय अवलोकीं ॥ १७६ ॥
विधिचातुर्य किती तें, करिल परीक्षा सुबुद्धि तिज बघतां ॥
लागेल दृष्टि वाटे खचितचि चतुराननाचिया हातां ॥ १७७ ॥
दुहिता मम आजवरी सुरक्षिता ती असेच पडद्यांनीं ।
अनुपम रत्न पहा तें, जाइल स्वकरांतुनीच परदानीं ॥ १७८ ॥

(साकी)

ऐकुनि नृपवच, लवंगिचा त्या गगनीं मोद न मावे ।
आशा माझी बहु दिवसांची पुरविसि, तुजसि नमावें ॥
सत्याचि प्रभुराया । तारिसि संकटिं तूं सदया ॥ १७९ ॥

(भुजंगप्रयात)

नृपा लागलीसे तृषा त्याच काळीं । म्हणे, आण पाणी सुते भाग्यशाली ।

---

१. बुद्धिबळाच्या खेळाला. २ अप्सरा.

दा. क्र.

जगन्नाथपंतांस लाजूं नको गे। [1]कवी थोर भेटे मला हा सुभाग्यें ॥१८० ॥

(गजगति)

नृपवचा परिसतां। तधिं उठे नृपसुता।

कलशपाणि सुमती। हलु निघे गजगती ॥ १८१ ॥

(प्रमाणिका[2])

(' पंचचामर ' ' नागराज ' बहर हजज़ मुसमन मक़्बुज.)

तिला सुतोष जाहला। न जाय तोहि लीहिला ॥

सुरम्य राजकन्यका। सुधन्य ती प्रमाणिका ॥ १८२॥

हरीपदांस ती नमी। तुझ्या कृपेंच धन्य मी ॥

म्हणे, सुकाल दाविला। तुम्हींच मंगला मला ॥ १८३ ॥

(प्रमुदितवदना)

जलघट करिं आणि जेथें पिता,। हलु बघत सलज्ज ती पंडिता, ॥

पुढिं सुखसदना विलासी उभी,। प्रमुदितवदना लवंगी न भी ॥१८४॥

(शशिवदना)

बघुनि सुरामा, वदत मनीं तो।

[3]स्मर करि जागा, क्षणि रमणी तो ॥ १८५ ॥

चकित करी ही, मननयनातें,।

निरखुनि पाही, शशिवदनातें ॥ १८६ ॥

(आर्या)

झालें लुब्ध पहातां, त्या रमणीचें सुरूप जारमन।

धन्यचि तो, नवतरुणी रमणी करिलहि स्वयेंच ज्या रमण ॥ १८७ ॥

---

१. लवंगीच्या कानीं शेवटचें चरण असें आलें ' पती थोर भेटे तुला हा सुभाग्यें ' हें तिच्या निजध्यासाचें फल. २. प्रमाणिकेचीं दोन चरणें मिळून एक पंचचामराचें चरण होतें. पंचचामर वृत्त " बहर हज़ज मुसमन मक़्बुज़ " या अरबी बहराशीं तंतोतंत मिळत आहे. त्या बहराचें वजन हें [ मफायलन, मफायलन, मफायलन, मफायलन ] उदाहरण उर्दू-" भला हो तेरा साक़िया पिलादे खूम् निचोड्कर " पंचचामरांत मात्रा २४ आहेत, तशाच वरील बहरांत २४ च येतात. ३. मदन.

प्रमुख करिल पहातां, नाकीं[1] ही रतिमदांत[2] देवपती[3] ।
काय नवल! नवरामा- धामा न्यावी किती वदति नृपती ॥१८८॥
चातुर्य सर्व वेंचुनि घडली ही मूर्ति कां! विधात्यानें ।
वंचावें कां सुजनां! संयमनेंपरां[4], परां[5], बुधा, त्यानें ॥ १८९ ॥

( अंजनीगीत )

उदका देउनि गेलि लवंगी । दृष्टीआडाचि झालि शुभांगी ॥
पंडित काव्याचा व्यासंगी, । तत्कवना रचितो ॥ १९० ॥
नाथ म्हणे हें ऐका वर्णन । कर्ण आणि तें देउनियां मन ॥
जितुकें आहे माझें ज्ञान । तेंवी कृति करितों ॥ १९१ ॥

( सोमयाजी[6] शंखनादी—मुतकारब मस्तुर )

कसें काव्य झालें--त्वरें, राव बोले ।
तिच्या वर्णनाचा, किं हो ग्रंथ साचा ॥ १९२ ॥

पंडितः— भुजंगी[6] [ मुतकारब महजूब ]

कवीची[7] सुता जाण आर्या, नडे । सदां जावया ही अनार्याकडे ॥
रसज्ञा गुणज्ञा पुढें धावती । तुला पाहुनी ये त्वरेनें अती ॥ १९३ ॥

---

१. स्वर्गलोकीं. २. अप्सरेंत. ३. सुरेंद्र. ४. योगाभ्यासी, मनोनिग्रही. ५. उत्तम, श्रेष्ठ. ६. सोमयाजी, भुजंगी, भुजंगप्रयात या तिन्ही वृत्तांत केवळ यगणच आहे. सोमयाजीचीं दोन चरणें मिळून भुजंगप्रयाताचें एक चरण होतें, व भुजंगप्रयाताचा एक अंत्य गुरु कमी केला असतां भुजंगी वृत्त होतें. फारशींत बहेर 'मुतकारबताम' जो आहे, तो भुजंगप्रयात वृत्ताशीं मिळतो. भुजंगप्रयातामध्यें वीस मात्रा आहेत, तशा मुतकारब ताममध्येंही २०च मात्रा आहेत, आणि चार रुकन [ गण ] आहेत. त्या प्रत्येक रुकानामध्यें पांच पांच मात्रा आहेत. 'मुतकारब ताम' चें वजन असें आहे "फऊलुन, फऊलुन, फऊलुन, फऊलुन, 'मुतकारब मशतुर' सोमयाजीशीं मिळत आहे. दोन मु. म. चें चरण मिळून एक 'मुतकारबताम'चा चरण होतो. व मु. का. ताममधून एक अंत्य 'लुन' काढिला असतां मु. का. महजब हातो. म्हणजे भुजंगीवृत्त होतें. म्हणून सदरील वृत्तावर आरबी बहेरचीं नांवें घातलीं आहेत. ७. कविता.

बादशाहः— (भुजंगीप्रयात—बहेर मुतकारब ताम)

लिहीलें कसें काय वाचूनि दावा । कळे अर्थ मातें, तसाची वदावा ॥
नसे शक्य कीं ठाव तूझा पहावा । जगामाजिं साऱ्या तुझी ती वहावा ॥

(ओवी)

नृपवच परिसोनि पंडित । संतोष पावला अत्यंत ॥
येथें दिसतें माझें हित । ऐशा विचारें बोलिला ॥ १९५ ॥

(आर्या)

सुस्तन चपलाक्षी ती, सुरम्यगात्री, सितांशुवदनाही ॥
भासे, घेउनि जाते, कलशीं जनमन भरोनि सदना ही ॥ १९६ ॥
शीघ्र कवित्वचि पाहुनि, भूपतिच्या मनिं प्रमोद बहु दाटे ॥
देतों प्रसन्न होऊनि, नृपति वदे, इष्ट माग जें वाटे ॥ १९७ ॥

पंडितः—

न वदावें, दानाप्रिय नीतिप्रिय नृपतिनें कधीं हें बा ॥
वाक्पालन परम कठिण, सहज कुणाला न लाव तूं लोभा ॥१९८॥
आशा लावुनि देशि न, जरि तरि शिरिं तव अनंतजन्म ऋण ॥
वाचादत्त न करिती नरपति, केल्या न दे, तरी मरण ॥ १९९ ॥
भूप म्हणे हें मद्वच, वाचालाची नव्हे द्विजा वाचा,
मागें इच्छित देतों, राहिन ऋणि ना कधीं भुदेवाचा[1] ॥ २०० ॥
झालें दानवचन जें, प्राणहि जातां न घेउं माघारा ॥
गोत्रव्रत अमुचें हें, जाण प्रतिज्ञा, करीन बोल खरा ॥ २०१ ॥

पंडितः—

नलगे तुरंग[2], गज, रथ, न तोष मानें[3], सुसौख्य मानीं[4] न, ॥
कुरंगनयना[5] द्या ही, स्वर्गाधिक सुख सदैव मानील, ॥ २०२ ॥

(ओव्या)

ऐकोनि भूप होय चकित । म्हणे, अघटित मागे पंडित ॥
काय द्यावें उत्तर निश्चित । चिंतातुर मनीं झाला ॥ २०३ ॥

---

१. ब्राह्मण. २. घोडा. ३. लक्ष्मीनें. ४. मानांत. ५. हरिणनेत्री [ लवंगी ].

परि तो राजकार्यधुरंधर । उदासीनता न दावी वर ॥
युक्तिवादें दे उत्तर । चतुर पंडिता तेधवां ॥ २०४ ॥

( शिखरिणी )

लवंगीच्या ताटीं बसुनिच तुम्ही भोजन करा ।
तरी देऊं आम्ही मिळवुनिहि तीच्या करिं करा ॥
जगन्नाथानें हें परिसुनि तया उत्तर दिलें ।
विधर्मी होती ना सुजन कधिं सद्वंशज भले ॥ २०५ ॥
स्वपित्रांच्या पुण्यें करिन तिजला ब्राह्मणि स्वरें ।
लवंगीचें साजें प्रखरतर वा पुण्यचि खरें ॥
नृपाला कीं मातें यवन तारि ही तीच करिल ।
विधात्यानें भाळीं लिहिलि वधु जी, तीच वरिल ॥ २०६ ॥
स्वजातीमाझारीं वधु बहु, नसे न्यून मजला ।
परी मोहा पावे बघुनि मन रामा सुविमला ॥
जरी देसी मातें करिन वधुही मी न दुसरी ॥
हिची कोठें कोणी करि महिवरी नारि न सरी ॥ २०७ ॥

( साक्या )

कन्याधन हें सत्यचि माझें, सत्ता परि दोघांची ॥
माझी, निजपत्निची, त्याहुनि स्वशरीरावर तीची ॥
कारण ती तरुणी । स्वतंत्र पाही वर म्हणुनी ॥ २०८ ॥
पतीपित्याच्या नात्यानें मी बोधिन दोघींनाही ॥
कळविन वळविन, यावर ईशस्वाधिन आहे सर्वहि ॥
पंडितवर्याला । नृपवर बोलुनि हें गेला ॥ २०९ ॥

( ओव्या )

ऐकोनि अनिश्चित पितृवचन । लवंगीचें झालें खिन्न मन ॥
भरूनि आले दोन्ही नयन । म्लान वदन जाहालें ॥ २१० ॥
म्हणे माता ममताहीन । पिता तिच्याच स्वाधीन ॥
कार्या माझ्या सहज विघ्न । लवंगी ऐसें मनीं चिंती ॥ २११ ॥

दा. क्र. 9332

(दिंडी)

बघे चोरुनि ती फिरुन पंडितातें। केलिसदनातुनि[१] त्वरें नीघतां ते॥
म्लानवदना ती सहज दिसे त्यातें। कमलनयनहि ते सार्द्र अश्रुपातें॥२१२

पंडितः— (गजल)

गुले रुख को तेरे दिलूबर हुआहै क्या खुदा जाने[२]
बाहरे नो हय लेकिन क्यौं नहीं खिलता खुदा जाने॥ ध्रु०॥
नखलबंदे करामतने षजर में कि हय क्या सनअत।
उसीमें गुल्, उसीमें फल, निकूल आया खुदा जाने॥ १॥
अगर तालेअ सिकंदरसे सहर की बाद आ जाती।
तो एक मोसम्में दोनों का मजा मिलता खुदा जाने॥ २॥
न जाउस् नखल् नोरस तग खजा[३] तुजको कसम् मेरी॥
बाहरे वसल् उस्की कोन पावेगा खुदा जाने॥ ३॥
तडप् 'जोया' के हय दिल्पर नहीं आराम यक् पलभर॥
दिले बुल्बुल् गुलेरुखसे नहीं हिलता खुदा जाने॥ २१३॥

लवंगीः— (मालिनी)

जननिच ममतेचें स्थान धीमंत बोले।

---

१. क्रीडास्थान. २. हे प्रिये! तुझ्या पुष्पवदनाला काय झालें, हें ईश्वर जाणे. तें या नूतन बहारांत कां खुलत नाहीं? पयवंद करणाऱ्या चमत्कारपूर्ण पुरुषानें (ईश्वरानें) या तरूच्या ठिकाणीं काय कारागिरी केली आहे! त्यांतच एकदम पुष्प आणि फळें निघालीं आहेत! या वेळीं सिकंदरी प्रारब्धानें प्रभातकालचे मंद पवना (पुष्पास प्रफुल्लित करणारे)– ची झुळुक आली असती, तर ईश्वर जाणे. एकाच मोसमांत दोन्हींचाही (पुष्पफलांचा) मजा मिळाला असता. ३. हे 'खजा' म्हणजे पर्णें झडविणाऱ्या वाऱ्या, त्या फलपुष्पयुक्त नूतन, कोमल, सुशोभित द्रुमाजवळ जाऊं नको. तुला माझी शपथ आहे. तिचा एकांतांतील भेटीची बाहर कोणाला प्राप्त होतो? ईश्वर जाणे. माझ्या मनाला तळमळ लागली असल्यामुळें पळभरही विराम मिळत नाहीं. ईश्वर जाणे. मनरूपी बुल्बुल् कमलवदनास सोडून हलूं शकत नाहीं.

खचित, पारि न माझ्या प्रत्ययालागिं आलें ॥
करिच उलट कैसी माय ही काय[1] दे जी ।
विभव उघड माझें नाशिते हाय! आजी ॥ २१४ ॥

(भुजंगप्रयात)

कथी वृत्त तो भूप भानूमतीला । म्हणे सांग जें योग्य वाटे मतीला ॥
कथा ऐकुनी ती जरा क्रोध दावी । विनोदीहि, लीला किती मीं वदावी ॥
किती प्रेमभावें म्हणे लाड केला । विजोडासि कां योजितां ? कन्यकेला ॥
विजाती, दरिद्री, अशी लोकनिंदा । मना नावडे योजना, सौख्यकंदा ॥

बादशाहः—

परीसासि स्पर्शे जरी लोह जाण । सुवर्णस्वरूपीच हो, हें प्रमाण ॥
म्हणे नाथ जामात होतांचि माझा । क्षणामाजि मी त्या करीं जाण राजा ॥

भानुः—

लवंगीहि चिंती पती नाथ व्हावा । मनीं प्रार्थिते नित्य त्या वासुदेवा ॥
म्हणे पंडितावांचुनी सत्य, माते । पित्यासारिखे अन्य सारे पहातें २१८
पतीला कथी साग्र भानूमती हें । वदें, ऐकुनी शाह, तूं स्वस्थ राहें ॥
तुझ्या आणि स्वाधीन माझ्याहि यांत । नसे, योजितो ईश जोडा जगांत ॥

(इंद्रवज्रा)

इच्छा हरीची कवणा कळेना । प्रारब्ध स्वच्छंदहि आकळेना ॥
होणार तें कांहिं कधीं टळेना, जाणोनि ऐसें मन हें वळेना ॥ २२० ॥

(ओव्या)

लवंगीस बोलाविलें । राजा पुसे काय झालें ? ॥
चदन कां हें उतरलें ? । सांग कन्ये मला तूं ॥ २२१ ॥
पती केला कोण पसंत ? । बुद्धिमंत वा श्रीमंत ॥
अथवा धरिसी संतपंथ, । अविवाहित राहुनी ॥ २२२ ॥
म्हणे ती मातें ठावें चरित्र । पाहिलें नाहीं एक चित्र ॥
आपण माझें पूर्ण छत्र, । सौख्यछायादातार ॥ २२३ ॥

---

१. शरीर, देह.




॥ अनंग बाण लागती, नसे सखे स्थिरा मती ॥
॥ करूं कशी तरी गती सुचे न कांहिं ही कृती ॥
॥ विचार ते न भंगती सुबोधिता मला किती ॥
॥ घडे न नाथ संगती म्हणूनि दुःखि मी अती ॥

[अभंग]

लवंगीचे बोल, सती भानुमती, पतीसि कथी ती, तेथें तेव्हां ॥ २२४

[आर्या]

पंडित हा एक पतीं, नर त्याविण भूवरील सर्व पिते ॥
स्पर्शींहि तनुस्पर्शा योग्य न, सन्मान्य असति यद्यपि ते ॥२२५॥
दिधला मीं वर करुनी, जो वरिला तव मनें सुधी तनये!
वदतो नृपती निश्चयि, तूं वर दुसरा म्हणूं कसा अनयें? ॥२२६
वचनामृत कर्णि शिरे, मृतजीवनऔषधापरी भासे ॥
चिंताभ्रांतुनि पडला बाहिर तीचा मुखेंदु जणुं ऐसें ॥ २२७ ॥
प्रेमाश्रु येति नयनीं, सद्गद कंठें वदेहि जनकासी ॥
इच्छित, सदया देसी, कल्पतरूपद तुझेंच भय नाशी ॥ २२८ ॥

[ओवी]

दुसरे दिवशीं लवंगीतातें । बोलावूनि पंडितातें ॥
कथी साग्र वृत्तांतातें । वाग्दाना मग तो करी ॥ २२९ ॥

[आर्या]

दिधली कन्या धन्या तुजला मोठें अती गुणागारा ।
झालें दानवचन जें, प्राणहि जातां न घेउं माघारा ॥ २३० ॥

[शार्दूलविक्रीडित]

देतां ही दुहिता मला, मजवरी ही आपुली हो कृपा ।
वैदीकीविधिनें विवाह कारितों मी सुंदरीशीं नृपा ! ।
इच्छा जी तुमची तसेंच करणें, मी सिद्ध त्यामाजिही ।
बोले भूप, वदा मुहूर्त म्हणजे त्या लागतों काजिही ॥ २३१ ॥
प्राजापत्यविवाहशास्त्रविधिनें अर्पी सुता पंडिता ।
केलें लग्न यथाविधी नृपतिनें ठेवूनियां दक्षता ॥
राणीनें दिधलें अपार धन तें तोषें सुतेला स्वयें ।
माझा पूर्णचि हेतु आजि नृपजा केला म्हणे निश्चयें ॥ २३२ ॥

---

१. अनीतिनें.

दंती, स्यंदन, अश्व, सुंदर, बहू सेवेंत नारी नर।
पागा, बाग, जमीन, रम्यहि तसें क्रीडार्थ दे मंदिर ॥
वर्णू कोठवरी अनुक्रम असा, संतोषवीला वर।
शाहानें वरदक्षिणेंत दिधलें सुग्राम मिर्झापुर ॥ २३३ ॥

[ओवी]

म्हणे पंडित इच्छा पूर्ण। झाली मिळवूनि लवंगीरत्न।
संतोषामाजी माझें मन। निमग्न आहे या काळीं ॥ २३४ ॥

[मालिनी]

अनुकुल मज आहे पूर्ण तारुण्य माझें।
अगद तनुहि माझी शक्तियोगें विराजे ॥
सहचरिहि लवंगी चारुगात्रीच साजे।
विभव सकल आहे, पाहिजे तें नरा जें ॥ २३५ ॥

(साकी)

एकांतामधिं कांता पाहुनि तल्लिन पण्डित बोले ॥
सुंदर पत्नीरत्न देउनी धन्य जगीं मज केलें ॥
अघटित तव करणी। ईशा नमितों मी चरणीं ॥ २३६ ॥

लवंगीकडे पाहून पंडितः— (आर्या)

रंभा ही ओवाळुनि टाकावी या तुझ्या नखावरती ॥
नर मीच धन्य जगतीं, सुख होतें अति सखे तुझ्या सुरतीं ॥ २३७॥
कुंतल कलाप मुक्तहि, पृष्ठाश्रय तव करी कुटील, मना ॥
शोभादायक किति ते, कळतें नयना, न वर्णिते रसना ॥२३८॥
कच हस्त मस्तकोद्गम, त्यापासुनि निघुनि ये पुढें सरळ ॥
दो स्कंधाहुनि, भासे, वाहे यमुना सुनील शुद्ध जळ ॥ २३९ ॥
केशांबुमाजि त्या तव, सुमुखांभोरुह किती तरी शोभे ॥
निसर्गशोभा अशि ही, पाहुनि मन्मन प्रतिक्षणीं लोभे ॥ २४० ॥
होउनि त्रिवेणिसंगम, प्रवेणि पाठीवरी पडे जेव्हां ॥

---

१. हत्ती. २. रथ.

[library stamp]

भुजंग काळा सफणा, मुखपुष्पावरि वसे दिसे तेंव्हां ॥ २४१ ॥

कवंगी:—

(उपजाति)

पतिव्रताधर्म समग्र नाथा । वदा मला दाउनि शुद्धपंथा ॥
गेल्या सती मुक्तिपदासि जैशा । जावें तसें मीं मनिं हीच आशा २४२

(दोहा)

पसे परमेसर तिसे तिरथले, भाखा थोरि जान ॥
पंडित कहे व्रत करे उसे नहीं छोरत कभि भगवान् ॥ २४३ ॥

(कवीत)

बरत बडा न पतिध्यानसे दुसरा । तिरथ बडा नमे पाद पतीको ॥
जप दुसरा फिर कछु नहिं लागत । तपका कारण नहीं है सतीको ॥
पति ईश्वर यह जान पुजत जो । सति वोही चुकावे नरक गतीको ॥
नूर बडा है जगमें उसका । सुरभी कांपे पूज्य मतीको ॥
उस सतीपर सीस नमावें । पाप जले मिले शुद्ध गतीको ॥२४४॥
पतिव्रत करके कीर्ति मिलावे । सोही पतिव्रता देव हिलावे ॥
कोपसे अपने जगकु जलावे । प्रसन्न होकर राज दिलावे ॥
जगमे व्रत तप सहज न ऐसा । जननमरण का तख्त धुलावे ॥
जगन्नाथ कहे यह नारीको । स्वल्प मारग सरग दिलावे ॥ २४५ ॥

(दाहरे)

चंद्रमुखी चपलाक्षी नारी, वुचडा क्या है भुजंग ॥
दंतपङ्गती वो हिरकणी, काली ओठ रंगे सुरंग ॥ २४६ ॥
मृगनयना यह सिंहकटी है गति हाथीके पांव ॥
वपरसे तो सज गइ अच्छी अंदर मारे घाव ॥ २४७ ॥
पतिव्रताके रक्षण को यह चपला, सिंह, भुजंग ॥
मृग, दंती, सब गुप्त रूपसे वास करत निजअंग ॥ २४८ ॥

[ शार्दूलविक्रीडित ]

वार्ता ही परिसोनि विप्रजन ते काशीस्थ झाले जसा ।

शास्त्रें त्या करिती बहिष्कृत तयीं देऊनि नीचोपमा ॥
पत्रा धाडिति त्या लवंगिपतिला दिल्लीस भीतां न ते ।
क्षेत्रांना सगळ्या तसेंच लिहिलें होते जिथें जाणते ॥ २४९ ॥
त्याचा खेद नसे जरा, परि क्षणीं देई तयां उत्तरा ।
मी कर्मांध खरा, स्वयें तुम्हि तरा, पित्रांसही उद्धरा ॥
सांडोनी सगळें स्वकार्य, कसि ही माझी तुम्हां काळजी ॥
साधा स्वार्थ बरा, निरर्थक असा घालूं नका काळ जी ॥२५०॥

(अभंग)

तया लवंगीचा नाथ । स्नान संध्या करी नित्य ॥
नित्य कर्म झाल्यावरि । आसनस्थ योग करी ॥ १ ॥
जीव शिवा भेटवीतो । हृदीं ईशा सांठवितो ॥
बैसे डोळे तो लावुनी । लोक निंदिति त्या ध्यानीं ॥ २ ॥
बोले त्याला कोणी ढोंगी । ध्यानिं धरी तो लवंगी ॥
लवंगी ती दूर बैसे, नाथ ध्यान करितसे ॥ ३ ॥
स्नानसंध्या झाल्यावर । भेटि भोजनानंतर ॥
पती दैवत मानुनी । मग्न राही त्याच्या ध्यानीं ॥ ४ ॥
आज्ञा पतीची नोल्लंघी । पतीव्रता ती लवंगी ॥
ऐसा तिचा नित्यक्रम । पतिसेवा हाचि नेम ॥ ५ ॥ ॥२५१॥

(भुजंगप्रयात)

अशा काळिं आल्या सख्या[1] त्या मिळोनी । बहू हासतां खेळतां तेथ त्यांनीं
लवंगीस अंगावरी पंडिताच्या । दिलें पाडुनी, त्या क्षणीं सुव्रताच्या ॥२५२
तिला भासलें मी पडे वन्हिमाजी । दिसे, धावला प्राण घेण्या यमाजी ॥
अती जाहला दाह तो सर्वदेहीं । न जाणे परी नाथ कांहीं विदेही ॥२५३॥
तरारून येती शरीरास फोड । तसें लाल झालें तिचें सर्व तोंड ॥
वदे जाहला दाह अत्यंत देहा! । प्रभूवीण त्राता असेना अहाहा! ॥ २५४॥
सुनेत्रांतुनी अश्रुधारा वहाती । तनू कांपते हें सख्याही पहाती ॥

---

१. लवंगीच्या मैत्रिणी.

मुखांतूनि तीच्या निघे हाय! माय!। वदे, भाजला सर्वही आज काय २५५

(इंद्रवज्रा)

धाऊनि येती परिचारिका हो । कां ही पुसे मूर्च्छित बालिका हो ॥
आली इका भोंडचि सांगती त्यां । दुष्कृत्यलोपाविण ना गती त्या ॥२५६॥

(मालिनी)

झडकरि कळवाया आलि ती स्वामिनी तें ।
वदत, न पळ वाया घालवी, चाल, माते! ॥
बघ तव तनया ती कोमला, लाडकी, जी ।
धरणिवरि पडोनी नेत्र कीं फाडती जी ॥ २५७ ॥
मुदित वदन झालें म्लान, ती दुःखिं चूर ।
झणिं तमॅ शशितेजा झांकितो जेविं क्रूर ॥
ढळढळ नयनांचे वाहती अश्रुपूर ।
चल, चल, चल, आतां राहसी काय दूर! ॥ २५८ ॥
तगमग करि जैसा मीन पाण्याविहीन ।
निकट पति असोनी पाहिना तीस जाण ॥
मिटवुनि नयनांला स्वस्थ तो बैसलासे ।
कठिणहृदय झाला! बद्ध जो प्रेमपाशें ॥ २५९ ॥
परिसुनि असि वार्ता जाहली आर्त राणी ।
कळविलि झणि राया ती सॅभावर्तकांनीं ॥
त्वरित नृपति आला धावुनी, मायही ये ।
भिषर्ज चतुर, ज्ञाते, बोलवीलेहि रायें ॥ २६० ॥
मुकुलित नयानां ती पाहतां माय बोले।
विगलित तनु कंपा पावते कां? हि, बाले! ॥
त्वरितचि शिर अंकीं घेतसे कंठ, दाटे ।

---

१. शरीर. २. दासी. ३. सख्या, ज्यांनीं पाडिलें त्या. ४. राहु. ५. दुःखी. ६. वार्ता. ७. घरांत वागणाऱ्यांनीं. ८. वैद्य, चिकित्सक. ९. किंचित् झांकलेले नेत्र. १०. गलित.

तनुवरि बघतांची स्फोट[1] ते मोठमोठे ॥ २६१ ॥

(भुजंगप्रयात)

समाधींतुनी मुक्त तों नाथ होय । शिरे काणिं त्याच्या तधीं शब्द हाय ! ॥
पहातां सखी बोलते, माय ! माय ! । जगन्नाथ, झालें म्हणे हीस काय ? ॥

(शिखरिणी)

स्वरें दावा माझा परसुखद सौभाग्यतिलक ।
तया पाही अंतीं नयनिं, तरि माझें शुभलकें[2] ॥
मला स्वर्गीं जाण्या शकुन बरवासे पतिमुख ।
लवंगी बोलें, दे तरि मज सदा तो बहु सुख ॥ २६३ ॥

(तारक)

बोलोनि निश्चेष्ट ती तेधवां हो । पाहोनि हें दुःख तीच्या धवा हो ॥
झालें असें काय ! माझ्या सखीला । बोले, वदा ही असी कां ? सुशीला ॥

(शिखरिणी)

प्रभातीं मी तूतें सहज वदलों कांहिं न, सखे !
म्हणोनी कां कोपा धरुनि पडसी ! सांग स्वमुखें ॥
प्रमाणाबाहेरी कुलिन वनिता ती पतिवरी ।
कधीं स्वप्नीं रागा, त्यजुनि अनुरागासि, न धरी ॥ २६५ ॥

(शार्दूलविक्रीडित)

पाहोनी बहु फोड ते स्वनयनीं साऱ्याच अंगावरी ।
ज्ञाता तो अवरी स्वदुःख कितिही, तों कंठ दाटे परी ॥
बैसोनी जवळी वदे, प्रियतमे ! तूं बोल आतां जरा ! ।
झाला म्लान मुखेंदु हाय ! तव, जो होता सखे, साजरा ॥ २६६ ॥

(इंद्रवजा)

शुद्धीवरी येउन पाहि त्यातें, । लाजे परी फार सती पित्यातें ॥
संकेत दावी पतिला असा कीं, । घे शीर नाथा, मम हें निजांकीं ॥२६७॥

---

१. फोड. २. कपाळ, नशीब.

(शार्दूलविक्रीडित)

वैद्यांनीं उपचार फार झटुनी केले, तरी ना बरें ।
वाटे तीस, पतीस ती म्हणतसे, होती अती घाबरे ॥
माझे प्राण, प्रयाण आज करण्या झाले दिसे सिद्ध कीं ।
नाथा! सत्सहवास हाय तुटतो!! दुःखी म्हणोनी सखी ॥२६८॥
घेऊनी जल हातिं, लावि नयनीं, सिंचीहि तीच्यावर ।
स्फोटाच्या वरूनी तसाच फिरवी तो हात तीचा वर ॥
ऐसें तो करितां तयाक्षणिं तिचे ते फोड, कीं लोपले ॥ २६९ ॥
गेले क्लेश लवंगिचे क्षणि, परी पंडीत ते कोपले ॥

(इंद्रवज्रा)

बोले असें तो, कृति ही छळाची । शक्ती न हें सिद्ध, रुजाबळाची[1] ॥
मी शापुनी भस्म करीन त्याला । जो कोणि पापास[2] प्रवृत्त झाला ॥ २७० ॥
सांगे लवंगी सुख वाटतें, जी । माता वदे ईशकृपाच आजी ॥
संतोषला भूप सुशब्दयोगीं । हा नाथ भासे वदतो सुयोगी[3] ॥ २७१ ॥

(भुजंगप्रयात)

लवंगीस त्या तो पुसे दुःखवृत्त, कथी कष्टती जें सखीवर्गदत्त ॥
असे ऐकुनी खिन्नता ये मनाला, म्हणे, रोध ठेवा पुन्हां खोजनाला ॥२७२॥

(शार्दूलविक्रीडित)

काशीवास बरा गमे मज, सखे! झालें पुरें सौख्य हें ।
मुक्तीचें स्थल जें असे प्रियतमे! भूलोकिं तें मुख्य हें ॥
यासाठीं मजला क्षणैक न बरें वाटे इथें राहणें ।
काळाचा नच नेम, घालिल कधीं घाला, मृगांकानने ॥ २७३ ॥
गेलें बाल्य समूळ खेळुनि, तसें तारुण्य क्रीडेंत या ।
वार्धक्य प्रगटे! अवाचि पथिं त्या प्रस्थान ठेवावया ॥
दावायास परेतभू कच पहा जे शुभ्रता पावले ।
काळाचे ध्वज भासती विशद हे, कीं संनिधी पातले ॥२७४॥

---

१. रोगपराक्रम. २. दुष्कर्म, पाप. ३. जगन्नाथ.

बोले पत्नि, प्रिया! प्रमाण मजला आज्ञा, चला काशिला ।
पूर्वींचा घट दुष्ट संचित पहा हा पाहिजे नाशिला ॥
येतां मृत्यु तिथें त्वरें सहजची होतो जरी मुक्तिद ।
संचीता मिळवी नको मज असें हें सौख्यही दुःखद ॥ २७५ ॥

(दिंड्या)

कळवि हेतू पंडीत त्या नृपाला । म्हणे, आज्ञा यात्रेसि द्या कृपाळा! ।
येथ आनंदें काल मीं क्रमीला । अतां राया, उपभोग पुरे झाला ॥२७६॥
बरा वाटे आम्हांसि काशिवास । दूर करितो जो साग्रही भवास ॥
तेथ राहुनि गंगेसि त्या भजावें । तिच्या सहवासें मुक्तिपदा जावें ॥२७७॥

( गजल )

नृपवर वदतो रुचलि तुम्हां कां? यात्रा अति त्वरिता ।
सोडुनी आम्हां काशीवासा कांतरि हो करितां ॥ ध्रु० ॥
हें वच परिसुनि उदासीनता मन्मनिं ये आतां ।
विरहानल हा जाळिल आम्हां उभयां, गुणवंता! ॥
शुचिर्भूत तुम्हि शुद्ध पवित्रहि विज्ञानी असतां ।
जेथें पापी धुति मल तेथें आपण कां जातां? ॥ १ ॥
नरजन्माचें पर्व साधुनी ज्ञानतीर्थीं न्हातां ।
अढळपदा गांठिलेंच अक्षय, स्थीर पदीं वसतां ॥
ऐसें असतां कशास आतां तीर्थाटणिं फिरतां ।
सांठविलें तुम्हि खचित गमे मज हृदयीं भगवंता ॥ २७८ ॥

(ओवी)

लवंगी कळवी मातेसी । जातों आम्हीं काशीसी ॥
आज्ञा द्यावी उभयतांसी । तीर्थयात्रा करावया ॥ २७९ ॥

पद—(रुचती का तीर्थयात्रा०)

सोडुनि कां जाशि आम्हां? प्रियतनये मंगले! ।
तुजविण मीं जगीं नाहीं क्षणभरही वागलें! ॥
तव विरहें प्राण माझे व्याकुळ गे कोमले ।

नकळे हें दैव कैसें यासमयीं क्षोभलें ॥ २८० ॥

पद (चाल-पंचतुंड नररुंडमालधर०)

कां करिसी या शोका? अंबे! श्रेष्ठ क्षेत्र ही श्रीकाशी ॥
या शुभयात्रेआड न ये तूं, हीच प्रार्थना तुजपाशीं ॥ ध्रु० ॥
तुजविण माते! अन्य कोण तरि मम वांच्छा ही पूर्ण करी ॥
जाउनि येत्यें पतिसंगें मी, त्वां दिधलें मज ज्या सुकरीं ॥
विचार करितां कळे अंतरिं कार्य कीर्तिकर दिगंतरीं ।
उदरांतुनि तव, पदरांत हि त्या येउनि सार्थक केलें तरी ॥
जाणुनि हें मज आज्ञा द्या, कीं संधी आली ही खाशी ॥
भगवंताला स्मरुनि विनवित्यें पतिपद सतिला अविनाशी ॥२८१

पद–(चाल--मजला वरिल सुभद्रा काय)

सदनीं न सुचे मज कांहीं । करूं गति काय तरी ॥ ध्रु० ॥ सोडोनी दुहिता मज ही जाय। कैसें कंठू मी तरि हाय । वत्सावांचुनि जैसी गाय। मोकळि धाय तसी झालें ॥ सदनीं० ॥ १ ॥ प्रतिकूल काला गती झाली । उदासीनता मज आली । असुख दिसें पुढें या भाळीं । कैसी कठीण ही वेळा ॥ सदनीं० ॥ २ ॥ २८२

(ओव्या)

पाहोनि उभयांच्या आग्रहा । सिद्धता करी सर्व शाहा ॥
ज्योतिषास मुहूर्त पाहा । ऐशी आज्ञा जाहली ॥ २८३ ॥

वस्त्रालंकार रत्नमाळा । लवंगीसह जामाताला ॥
देऊनि तोषवी उभयांला । ज्ञाता शाहाजाहान तो ॥ २८४ ॥

पदाति, अश्वारूढ वीर । रथ, हय, गजादि सुंदर ॥
सेवेलागीं नारी नर । दिधलें अपार धन संगें ॥ २८५ ॥

सुमुहूर्तीं निघे पंडित । स्वगृहांतुनी पत्नीसहित ॥
मंगलवाद्यगजरांत । नगरांतुनी जातसे ॥ २८६ ॥
आशीर्वादमंत्र विप्र बोलले । स्तुतिपाठक जयघोषें गर्जले ॥

दुवागो[1] दुवा देते झाले । बांधोनि इमाम जामिना[2] ॥ २८७ ॥
मंगल कलश जल पूर्ण । सौभाग्यवति नारी घेऊन ॥
सव्य भागाला येऊन, उभ्या राहती शकुनार्थ ॥ २८८ ॥
पुष्पें वर्षिती पंडितावरी, नगरवासी नरनारी ॥
उभे राहोनि आपुल्या द्वारीं, मार्गावरी पंडिताच्या ॥ २८९ ॥
दुःखी जाहले प्रजाजन, राजा अती उदासीन ॥
उभयतांचा वियोग सहन, न होय अंतःकरणाला ॥ २९० ॥
राहा, आतां सर्व आपण, येतों ऐसें विचारून ॥
वळवी रथ वेगें करून, नगरा बाहेर पंडित ॥ २९१ ॥
येऊनि काशीस प्राप्त झाले, एक गृह पाहोनि राहिले ॥
दिवस आनंदें कांहीं क्रमिले, लवंगीसह पंडितानें ॥ २९२ ॥
एके दिवशीं विप्रजन येवोन । म्हणती श्रेष्ठ आपण ॥
पंडिता, अति ज्ञानसंपन्न । म्हणोनि सूचना करितसों ॥ २९३ ॥
आतां प्रायश्चित घ्यावें । विप्रज्ञातींत पुन्हां यावें ॥
शुद्ध होवोनि मुक्त करावें । श्रेष्ठ कुलातें आपुल्या ॥ २९४ ॥
पंडित म्हणे तुम्ही धन्य । परोपकारी जगीं मान्य ॥
तुमचें अनुपम आहे पुण्य । शिरसा मान्य मज आज्ञा ॥ २९५ ॥
लवंगीसह करा शुद्ध । मी तिच्या प्रेमांत बद्ध ॥
ऐकोनि भाषण हें विरुद्ध । कोपें निघूनि द्विज जाती ॥ २९६ ॥
हें आप्पयादीक्षिता कळलें । ते पंडिताकडे स्वतां आले ।
त्यांनीं पंडितास बोधिलें । सविस्तर ऐका तें ॥ २९७ ॥

(आर्या)

कामेच्छा तव अझुनी, झाली नाहीं कधी कशी तृप्त ।
यवनीरतींत यौवन, गेलें, वार्धक्य जाहलें प्राप्त ॥ २९८ ॥

---

१. आशीर्वाद देणारा मुसलमान. २. इमाम जामीन = मुसलमानांत प्रवासाकरितां निघतांना हिरव्या फडक्यांत कोणतें तरी नाणें घालून प्रवास सुखप्रद होण्याकरितां डावे हाताचे दंडावर बांधितात.

न कळे तुजला कैसें, जरठा! कच कृष्ण होति रे धवल ।
वदनीं कलंक विधुपरिं, परि विन्मुखता न कामिं हें नवल ॥२९९॥
वाढे जरठत्व जसें, विषयीं तव होत वासना तरुण ॥
भवनींदि मग्न करिल तीं, यमहि न पाप्यासि होतसे करुण ॥३००॥
कलिमलवर्धन करुनी, बुडविलें[2] कुलमूल स्पष्ट हें दिसतें ॥
तरविल ऐसी नाथा, स्वल्पाशा मन्मनांत कीं वसते॥ ३०१ ॥
घेउनि प्रायश्चिता, होउनि जा पंडिता, सुनिर्मलसा ॥
शास्त्रज्ञ तूं कुशलही, जाणसि पूर्त्यर्थ सांग[3] धर्मरसा ॥ ३०२ ॥

(ओवी)

लवंगीसह करा शुद्ध । मी तिच्या प्रेमांत बद्ध ॥
पंडित बोलतां ऐसें विरुद्ध । अप्पयादीक्षित म्हणाले ॥ ३०३ ॥

(आर्या)

सुज्ञा! यवनी ब्राह्मणि व्हावी कैशी? मला न हें कळतें ॥
शास्त्राधार न त्याला, कुसंगतीनें अशाच कुल मळतें ॥ ३०३ ॥

(शार्दूलविक्रीडित)

विद्येच्याहि बळें मला वदुं नका, हे बोल जे फोलसे ।
दांभीकापरि सर्व कर्म तुमचें, स्पष्टार्थ निर्मूलसें ॥
दावीतां वरि डामडौल सगळा संभाविताच्या परी ।
काळेकूट विचार सर्व भरले गर्वासवें अंतरीं ॥ ३०४ ॥
अर्धांगीसह शुद्ध ना जरि तुम्हीं केलें मला दीक्षित ।
ही भागीरथि सुप्रसिद्ध यशदा, साधीन आजी हित ॥
देवांचा हरि गर्व जी अति रयें रक्षोनि पापी जनां ।
माझी आणि लवंगिची पुरविते ती सर्व सत्कामना ॥ ३०५ ॥

अप्पया:— (शिखरणी)

जगन्नाथा! तूं बा, शुचितर जगीं योग्य खचित ।

---

१. वासना. २. वासना हा अध्याहृत कर्ता बुडवील या क्रियापदाचा आहे.
३. संपूर्ण—सर्व अंगांसह.

लवंगीचें तैसें अतिशय असें भाग्य उचित ॥
तुम्हां होणें गंगा करिल कधिं हे पावन, वदा ।
वधूं, आम्हीं तेव्हां अमरसरिता सुंदर पदा ॥ १०६ ॥

पंडितः— मला गंगा आतां यवनिसह ती पूत करिल ।
चला माझ्या संगें, नयनिं बघण्या, हातिं धरिल ॥
तुम्ही प्रायश्चित्तें द्विजजन सदा पोट भरितां ।
परांचा चातुर्यें धनघट करीतां झट रिता ॥ १०७ ॥

(अभंग)

ऐसें बोलुनियां लवंगीसहित । निघे जगन्नाथ, गंगेकडे ॥ १ ॥
जनही मागें त्या जाताति पहाण्या । बोलति वैगुण्या, काढोनि ते ॥ २ ॥
अप्पय्याच्या संगें शास्त्री पुराणीक । विद्वांस अनेक, कर्मनिष्ठ ॥ ३ ॥
ब्राह्मणाच्या घाटावरी प्राप्त झाले । वर उभे केलें, जगन्नाथा ॥ ४ ॥
कर्मनिष्ठ विप्र म्हणताति काय । पायरीसी पाय, लावूं नको ॥ ५ ॥
गंगा येथें येवो तुझ्या पुण्यबळें । खालीं उतरलें, पाहीजे ना ॥ ६ ॥
अती नम्रभावें, पंडित बोलला । येथोनिच तिला, नमीतों मी ॥ ७ ॥
उपकार हेच आहेत अनंत । येऊं दिले येथ, पावेतों जी ॥ ८ ॥
साष्टांग नमन अनन्यभावानें । केलें पंडितानें, गंगेप्रती ॥ ९ ॥ १०८

(शिखरिणी)

कृपाशीले गंगे! सकल जगिं तीर्थें सुनमनीं ।
मला उद्धाराया दिससि अति शंकाकुल मनीं ॥
शिवाचीही कणीं मजविषयिं झांकीति उपकरीं ।
मला उद्धारोनी अखिल सुरगर्वा परिहरी ॥ १०९ ॥
मदुद्धारें सारें जग करिल आश्चर्य पुरतें ।
तिरस्कारें कोकीं जन बघति, त्या कीर्तिकर तें ॥
जगीं होवो यावद्रविशशि तुझें नांव बरवें ।
विलोकोनी मातें सुरवरहि गातील सुरवें ॥ ११० ॥

---

१. चांगल्या शब्दानें.

(मंदाक्रांता)

घेती गंगे! अघहर तुझें नाम जे नित्य भक्त ।
पीडा बाधे नच कधिं तया होति ते दुर्गमुक्त ॥
तेंची माते झडकरिं करी संसृतीपाशनाश ।
नामारंभीं तव वसतसे विघ्नहंता गणेश ॥ ३११ ॥
गावें आम्हीं किति तरि तुझें नाममाहात्म्य माते ।
घेतां पापी सहज तरती नाम तेंचीं भवातें ॥
सूर्यालागीं तिमिर हरण्या सांगणें काय लागे ।
तैसें तारी, हरुनि अघ तें नाम तूझें मला गे ॥ ३१२ ॥

(मालिनी)

शिशु करि अपराधा अज्ञतेनें, तयातें ।
जननि उठुनि कोपें धांवते ताडण्यातें ॥
तधिं तिज मिठि देतां प्रेम मातेस दाटे ।
उचलुनि कटिं घेतां चुंबितां मोद वाटे ॥ ३१३ ॥

(भुजंगप्रयात)

तशीं लेंकरें हीं कितीएक तूझीं । अती पातकी घातकी सृष्टिमाजी ॥
जयासाठिं निर्मी प्रभू कुंभिपाका । तयाची हि लावीसि स्वर्गीं पताका ३१४
नको अंत पाहूं त्वरें धाव आतां । दयाळे! करीं तूं धरी या अनाथा ॥
बुडूं लागला हा भवाब्धींत माते । ह्मणी नाशि तेजोमये! या तमातें ३१५
अती शुद्ध पाहोनि तें अंतरंग । जणूं येति आनंदरंगीं तरंग ॥
चढूं लागली वेगिं सोपानपंक्ती । तया पंडितालागि देण्यास मुक्ती ॥३१६॥
अधीं हात काढी स्वयें माय एक । तया पाहुनी तो वदे [२]राय "ऐक ॥
प्रिया ही लवंगी नमी त्वत्पदाब्जीं । तिला कां न देसी गती मोक्षकाजीं ॥

(साक्या)

चतुर्भुजा त्रीनेत्रा, वरदा, अभयप्रद जी गंगा ॥

---

१. ग=गणपति. २. जगन्नाथराय.

त्रिपथगती त्रैलोक्यपूजिता ये धावुनि अघभंगा ॥ ३१८ ॥
शंख चक्र करीं, सितांभोज, अति शोभे चवथि गदा ही ॥
प्रभा जियेची सहस्रेंदुसम, दिपवि दिशा त्या दाही ॥ ३१९ ॥
शुभ्र विमल अति कंठीं माला मुक्तांच्या जी घाली ॥
जगन्नाथ कवि मुक्त कराया मकरारूढ निघाली ॥ ३२० ॥
प्रमुदितवदना, दे सुख त्यांना चरणिं शरण जे येती ॥
पापी धरितां करीं, न बघते काय कृती तसि ज्ञाती ॥ ३२१ ॥
ज्ञानचक्षुनें विलोकि तो तिज तोडी जी भवबंध ॥
साभिमान ते कर्मठ ब्राह्मण चर्मचक्षुंनीं अंध ॥ ३२२ ॥
प्रेमाश्रू ये नयनीं बघतां कंठ सद्गदित झाला ॥
धन्य म्हणे तो माय जगीं तूं, तारिसि दीन जनांला ॥ ३२३ ॥
घाली कंठीं कर दोघांच्या, निजहृदयीं धरि त्यांला ॥
माता जैसी बहु दिवसांनीं भेटे कीं तनयाला ॥ ३२४ ॥
स्मितहास्या जी, प्रसन्नवदना, सुलोचना, ती पाही ॥
प्रेमें उभयां, अभया देई, वर्णूं काय कृपा ही ॥ ३२५ ॥
म्हणे, शुद्ध तूं शुचिर्भूत अति पंडितवर्या धन्य ॥
लवंगि तैसी पुण्यप्रतापी, पतिव्रता, मज मान्य ॥ ३२६ ॥
ऐसें बोलुनि उभयांसह अदृश्य होय ती माता ॥
नाथ जनां नच दिसे लवंगी शोधुनि तेथ पहातां ॥ ३२७ ॥

# उपसंहार.

( शिखरिणी )

लवंगीतें नेलें प्रभुपदिं, जगन्नाथ सुपती ।
असे नर्णी कोठें पति इतर कांतेस जपती ॥
जरी 'अर्थीं कामीं' करिति वचना पूर्ण सगळे ।
तुवां 'धर्मी' केलें निजवचनही सार्थ अपुलें ॥ २ ॥
जिला श्रीगंगेनें अभय दिधलें मुक्त करुनी ।
लवंगी ती धन्या मजसि अभिवंद्या त्रिभुवनीं ॥
जगन्नाथा! माथा नमवित पदीं पंडितवरा! ।
दयेनें दासा या गणपतिकृपापात्रचि करा ॥ ३ ॥

( शार्दूलविक्रीडित )

वाग्देवी करवी प्रसाद करुनी अत्यल्प सेवा अशी ।
जे भाषानिपुणीं कृपां[1] परिशिली झाली न जी फारशी ॥
साहित्यादिक साधनीं सजविली झाली मनासारखी ।
ऐसें प्रेम पसायदान[2] मजला द्यावें तुम्हीं पारखीं[3] ॥ १ ॥

( वसंततिलका )

जेणें मला वदविली अतिरम्य वाणी ।
चिंतामणी गुणगणीं वितरी शिराणी ॥
श्रीबाळकृष्णगुरुराजपदांघ्रि भावें ।
वंदीतसें, मज शिशूस सुखी करावें ॥ ४ ॥

---

प्र. श्री ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रा. क्र. 1332

१. कृपेनें. २. प्रसाददान. ३. परीक्षकांनीं, वाचकांनीं.



# साकी.

चुन्निलाल सुत कचरदास नित प्रभुच्या पायीं लीन ॥
साधु भक्त अति अल्पवयीं हा साहु थोर कुलीन ॥
ज्याच्या साह्य बलें, प्रसिद्ध पुस्तक हे झालें ॥

दा. क. 9332
REFBK-0001332
REFBK-0001332

मुळें कोणत्याही काव्यलोलुप पुरुषाला तें वाचण्याची इच्छा होणें अगदीं साहजिक आहे असें मला वाटतें.

ऐतिहासिक पुरुषांच्या चरित्राप्रमाणें कवींच्या चरित्रांत वस्तुतः पाहतां अद्भुत अशा गोष्टी फारशा किती असणार? अर्थात् नाहीं. त्यामुळें युद्धाच्या रम्य कथा वाचण्यांतच रंगून जाणाऱ्या सामान्य वाचकास, यांत असें वाचण्याजोगें काय आहे? अशी शंका येईल. पण त्याचें निराकरण सहज होण्याजोगें आहे. तें असें कीं, कोणी एखादा थोर गृहस्थ आपणांस प्रथम परिचित होतो तेव्हां त्याचें सौजन्य व उदात्त विचार वगैरे पाहून आपणांस मोठें समाधान वाटतें, व अशा वेळीं हे गृहस्थ कोण, कोठें राहतात, वगैरेसंबंधीं माहिती आपण आस्थापूर्वक मिळवून ठेवतों. मनुष्यमात्राचा असा स्वभावच आहे. याचें तरी वास्तविक कारण काय? ठिकाण व नांव कळल्यानें त्या गृहस्थाच्या विचाराच्या उदारपणांत कांहीं अधिक भर पडत असते काय? पण तसें कांहीं नसूनही त्याच्या सौजन्यादिकांवरील प्रेमामुळेंच आपण ही सर्व माहिती मोठ्या आदरानें संग्रहित करितों. तोच प्रकार या चरित्राचा आहे. पंडित जगन्नाथराय यांचे काव्यांतील माधुर्य, चातुर्य व स्पष्टोक्ति इत्यादि गुण पाहून त्यांवर रसिकांचें जें प्रेम बसतें, त्यामुळें त्यांचें चरित्र वाचण्याची उत्सुकता उत्पन्न होते व त्याच प्रेमामुळें हें चरित्र मोठ्या आवडीनें वाचण्याची वाचकांस उत्कंठा वाटेल अशी मला आशा आहे.

पंडित जगन्नाथराय हे अतिशय उच्च प्रतीचे कवि होते. त्यांचें चरित्र गद्यरूपानें प्रसिद्ध करण्याचे एक दोन प्रयत्न आजवर झाले आहेत. तरी प्रस्तुतचा प्रयत्न हा कवितारूपानें असल्यामुळें तो या कथानायकाच्या कवित्वास अधिक सुशोभित करीत आहे असें मला वाटतें.

या चरित्रांतील कांहीं गोष्टींसंबंधानें ऐतिहासिक सत्य या दृष्टीनें वाद आहे. त्यांत शिरून त्याचें खरें स्वरूप पूर्णपणें शोधून काढण्याची फार आवश्यकता असली तरी तसें करण्याचें हें स्थळ नसल्यामुळें येथें त्याचा फार विस्तार करीत नाहीं. त्यांत एक मुद्दा असा आहे कीं, पंडित हे दिल्लीस असतांना बादशहा अकबर होता कीं शहाजहान होता? परंतु पंडितांच्या आसफ-विलासांत शहाजहान यांजकडून त्यांस 'पंडिजराज' ही पदवी दिली गेली असल्याबद्दल